0.

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

ज्ञानगंगा घरोघरी

## व्यवस्थापन मंडळ बैठक

# कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| बैठक क्रमांक | : | 151 |
| स्थळ | : | विद्यापीठ प्रशासकीय इमारत - सभागृह<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ<br>नाशिक, 422222 |
| वार व दिनांक | : | गुरुवार, दिनांक : 19 नोव्हेंबर 2015 |
| वेळ | : | सकाळी : 11.30 |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

---

## कार्यवृत्त

151 वी, व्यवस्थापन मंडळ बैठक, गुरुवार, दिनांक 19 नोव्हेंबर, 2015 रोजी सकाळी 11.30 वाजता, विद्यापीठ प्रशासकीय इमारत - सभागृह, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

1. मा. प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे, कुलगुरु, — अध्यक्ष
2. मा. डॉ. डब्ल्यु. एन.गाडे, कुलगुरु, पुणे — सदस्य
3. मा. डॉ. व्ही. एल. माहेश्वरी,जळगाव — सदस्य
4. मा. श्री. उल्हास एन. गवळी, औरंगाबाद — सदस्य
5. मा. डॉ. प्रमोद बियाणी, संचालक, शैक्षणिक सेवा विभाग — सदस्य
6. मा. श्री. हेमंत टकले, मुंबई — सदस्य
7. मा. प्रा. कपिल कुमार, नवी दिल्ली — सदस्य

डॉ. प्रकाश अतकरे, कुलसचिव सचिव म्हणून, श्री. पंडित गवळी, वित्त अधिकारी, आणि डॉ. अर्जुन घाटुळे, परीक्षा नियंत्रक हे निमंत्रित म्हणून बैठकीस हजर होते.

**खालील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.**

1. मा. सचिव,उच्च व तंत्रशिक्षण,मुंबई — सदस्य
2. मा. सचिव, उद्योग, मुंबई — सदस्य
3. मा. सचिव, कृषी, मुंबई — सदस्य
4. मा. संचालक, तंत्रशिक्षण — सदस्य
5. मा. संचालक,उच्च शिक्षण, पुणे यांचे प्रतिनिधी — सदस्य
6. मा.संचालक, व्यावसायिक व प्रशिक्षण — सदस्य
7. मा. डॉ. आर.सेशा अय्यर, मुंबई — सदस्य
8. मा. डॉ. एस.ए. ठोंबरे. औरंगाबाद — सदस्य
9. मा. डॉ. बंदी व्यंकटेशवारलू, कुलगुरु, परभणी — सदस्य
10. मा. डॉ. विद्या येरावडेकर, पुणे — सदस्य

| विषय क्रमांक | | तपशील |
|---|---|---|
| 151.1.0 | | स्वागत व सादरीकरण<br>**कुलसचिवांनी सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले. त्यानंतर मा. कुलगुरु यांनी नव्याने नियुक्त करण्यात आलेले व्यवस्थापन मंडळाचे सदस्य, श्री. हेमंत टकले आमदार, विधान परिषद व प्रा. डॉ.कपिल कुमार, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्ली यांचे विद्यापीठाच्यावतीने पुष्पगुच्छ देऊन तसेच त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा घेऊन सादरीकरणास सुरवात केली. त्यात त्यांनी खालील बाबींचा उल्लेख केला.**<br>**ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया 2015-16, विद्याशाखा निहाय तसेच शिक्षणक्रमानुसार प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची माहिती तक्ता, भारतीय टपाल विभाग व एस.टी पार्सल द्वारा पाठविण्यात आलेली विद्यार्थ्यांना पुस्तके, YCMOU e-suvidha mobile application,** |

| | | |
|---|---|---|
| | | **विविध शिक्षणक्रम निहाय प्राप्त झालेले प्रवेश शुल्क, गुंतवणूक अहवाल, अग्रीम समायोजन, परीक्षा निकाल, अगरवाल समिती - विद्यापीठाचे रँकिंग, नोव्हेंबर 2015 पासून उत्तरपुस्तिकेवर (अभ्यासकेंद्र, शिक्षणक्रम, परीक्षेचा दिनांक, वेळ, कायम नोंदणी क्रमांक, परीक्षा क्रमांक, विद्यार्थ्यांचे नाव, इ.) छपाई करुन देण्यात येणार आहे. तसेच डिजिटल मूल्यमापन, महत्वाच्या बैठका, इ. याबाबत सादरी करण केले.** |
| 151.2.0 | 151.2.1 | दि. 10 ऑक्टोबर, 2015 रोजी झालेल्या 150 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीचे कार्यवृत्त वाचून त्यावर मा. कुलगुरू यांनी स्वाक्षरी करणे.<br>**व्य.मं.ठराव: दिनांक 10 ऑक्टोबर 2015 रोजी झालेल्या 150 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करुन त्यावर मा. कुलगुरु यांनी स्वाक्षरी केली.** |
| | 151.2.2 | दि. 10 ऑक्टोबर, 2015 रोजी झालेल्या 150 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल<br>(टिपणी — सदर कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीत सादर करण्यात येईल.)<br>**व्य.मं.ठराव: दिनांक 10 ऑक्टोबर 2015 रोजी झालेल्या 150 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत झालेल्या निर्णयावरील कार्यवाही अहवाल पुढील बैठकीत सादर करण्याबाबत नोंद घेण्यात आली.** |
| 151.3.0 | | **कार्योत्तर मान्यतेचे विषय** |
| 151.4.0 | | **सखोल चर्चा करण्याचे विषय** |
| | 151.4.1 | दिनांक 6 मे 2015 सभा क्र.151 व दिनांक 24 ऑगस्ट 2015 सभा क्र.152 रोजी झालेल्या बांधकाम समितीच्या बैठकांचे इतिवृत्त व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेसाठी व खालील विषय विचारार्थ सादर.<br>(टिपणी - दि. 06 मे 2014, सभा क्र. 151 व दि. 24 ऑगस्ट 2015, सभा क्र. 152 रोजी बांधकाम समितीची बैठक मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सदरहू दोन्ही बैठकीत बांधकाम समितीने घेतलेल्या निर्णयाचे इतिवृत्त मा.व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेसाठी सविनय सादर)<br>(Gazette : Ordance No. 40 (3 of 1993) 5.10 All the decision/recommendation of committee shall be submitted to the BOM of the university for final approval & ratification)<br>**व्य.मं.ठराव: दिनांक 6 मे 2015 सभा क्र.151 व दिनांक 24 ऑगस्ट 2015 सभा क्र.152 रोजी झालेल्या बांधकाम समितीच्या बैठकांचे इतिवृत्ताची नोंद घेण्यात आली.** |
| | 151.4.2<br>बां.स.बैठक<br>400/2015/03.2<br>400/2015/07.1 | पुणे विभागीय केंद्र इमारत बांधकाम अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता व निविदा प्रक्रिया करण्याबाबतची बाब विचारार्थ.<br>(टिपणी : विद्यापीठाच्या पुणे विभागीय केंद्रासाठी पुणे महानगरपालिकेकडून 30 वर्षाच्या करारावर जागा मिळालेली आहे. सदरहू जागेवर विद्यापीठाचे पुणे विभागीय कार्यालयासाठी इमारत व कम्युनिटी कॉलेजसाठी इमारत बांधकाम करण्याचे प्रस्तावीत आहे. सदरहू कामासाठी अर्कि. मनोज जाधव मे. अविष्कार आर्किटेक्टस अँड इंजिनिअर, अहमदनगर यांची आर्किटेक्ट म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. अर्कि.श्री जाधव यांनी विद्यापीठाच्या सुचनेनुसार पुणे विभागीय कार्यालयाची इमारत व कम्युनिटी कॉलेजसाठी इमारत बांधकामाचे रु.13.10 कोटीचे अंदाजपत्रक बांधकाम कक्षास सादर केलेले आहे. सदरहू अंदाजपत्रक मा.बांधकाम समिती सदस्यांच्या विचारार्थ व प्रशासकीय मान्यतेस्तव सविनय सादर.<br>**<u>बांधकाम समिती ठराव क्र. अ/400/2015/03.2 (दि. 6 मे 2015)</u>**<br>पुणे विभागीय केंद्राच्या इमारत बांधकामाच्या अंदाजपत्राकावर समिती सदस्यांनी सविस्तर चर्चा करुन असा निर्णय घेतला की अर्कि.जाधव यांनी विद्यापीठाच्या सुचनेनुसार पुणे विभागीय कार्यालयाची इमारत व कम्युनिटी कॉलेजसाठी इमारत बांधकामाचे रु. 13.10 कोटीचे अंदाजपत्रकास बांधकाम समितीच्या वतीने मान्यता देवून मा.वित्त समिती व मा.व्यवस्थापन मंडळ यांच्या मान्यतेसाठी सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला.<br>(Gazette: Ordance No. 40 (3 of 1993,7.2.1 Adminstrative Approval – A formal acceptance to the proposal has been obtained from the building and works committee and board of management of the university.<br>8.2 The Committee shall recommend and obtain the board of management's administrative approval and expenditure sanction in respect of all the works other than maintenance works to be undertaken by the university or to be entrusted to the PWD)<br>(टिपणी : पुणे विभागीय केंद्रासाठी पुणे महानगरपालिकेकडून मिळालेल्या जागेवर विभागीय कार्यालय व कम्युनिटी कॉलेजसाठी इमारत बांधकामासाठी विद्यापीठाने नियुक्ती केलेले अर्कि.मनोज जाधव यांनी तयार केलेले अंदाजपत्रक व नकाशे दि. 06 मे. 2015 रोजी झालेल्या बांधकाम समितीच्या मान्यतेसाठी |

| | | |
|---|---|---|
| | | सादर करण्यात आले होते. त्यानुसार बांधकाम समितीने ठराव क्र. अ/400/2015/03.2 नुसार मान्यता दिली आहे. अंदाजपत्रक व नकाशे पुणे महानगरपालीका व सार्वजनीक बांधकाम विभाग पुणे यांच्याकडे तांत्रिक मान्यतासाठी सादर करण्यात आले आहे. तांत्रिक मान्यतेची प्रक्रिया अंतिम टप्यात आहे. तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदरहू कामाची निविदा प्रक्रिया सुरु करण्यास बांधकाम समिती च्या मान्यतेसाठी विषय सविनय सादर.)<br>**बांधकाम समिती ठराव क्र. अ/400/2015/07.1** (दि.24 ऑगस्ट 2015)<br>पुणे विभागीय केंद्र इमारत बांधकाम करण्याच्या अंदाजपत्रक व नकाशाला तांत्रिक मान्यता बाबत सा.बा.वि.पुणे येथे चौकशी केली असता त्याबाबत सा.बा.वि.यांनी सांगितले की सदरहू कामासाठी तांत्रिक मान्यता आज किंवा उद्या मिळेल असे सांगितले. समिती सदस्यांनी यावर सविस्तर चर्चा केली त्यात सर्व समिती सदस्यांनी सदरहू प्रस्तावावर असे मत मांडले की जरी अंदाजपत्रक नकाशानुसार संपूर्ण कामासाठी तांत्रिक मिळाली असली तरी सुध्दा सदरहू नकाशाप्रमाणे विद्यापीठाला आवश्यकतानुसार तीन भागामध्ये इमारतीचे बांधकाम करण्याची तरतूद आहे त्यानुसार सुरुवातीस विद्यापीठाच्या विभागीय केंद्राच्या प्रशासकीय कार्यालयासाठी आवश्यक असणारे बांधकाम पहिल्या टप्यात करण्यात यावे व उर्वरीत बांधकाम आवश्यकतेनुसार करावे असे वाटते. यावर समिती सदस्यांनी सविस्तर चर्चा करुन खालीलप्रमाणे निर्णय घेतला.<br>पुणे विभागीय केंद्राच्या प्रशासकीय कार्यालयासाठी पहिल्या टप्याचे बांधकाम करण्यासाठी तांत्रिक मान्यता मिळालेल्या अंदाजपत्रकातील पहिल्या भागाच्या अंदाजपत्रकाची प्रारुप निविदा तयार करुन सार्वजनीक बांधकाम विभागाकडून मंजूर करुन निविदेबाबतची पुढील कार्यवाही विद्यापीठ स्तरावर करुन विद्यापीठामार्फत बांधकाम करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले व सदरहू ठराव पुढील व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.<br>(Gazette : Ordance No. 40 (3 of 1993) 7.2.2 Technical Sanction A formal technical sanction has been accorded by the competent authority.)<br>**वित्त समिती ठराव क्र. 5.4.10** – बांधकाम समितीच्या ठरावास मान्यता देण्यात आली. त्यास व्यवस्थापन मंडळाच्या मंजूरीस्तव शिफारशीसाठी सादर.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीच्या शिफारशीनुसार पुणे विभागीय केंद्र इमारत बांधकाम एकूण रुपये 13.10 कोटीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता व पहिल्या टप्यामध्ये होणाऱ्या अंदाजे रुपये 5 कोटी 51 लाख खर्चास व निविदा प्रक्रिया राबविण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | 151.4.3<br>बां.स.बैठक<br>400/2015/03.4<br>400/2015/08.1 | विद्यापीठ आवारातील व विभागीय केंद्रावरील इमारतीचे वार्षीक देखभाल दुरुस्तीसाठीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता व वार्षिक देखभाल दुरुस्तीची निविदा काढण्याची बाब विचारार्थ.<br>(टिपणी : विद्यापीठ आवारातील काही इमारतींचे बांधकाम होऊन बरेच वर्षे झाले आहेत त्यामुळे सदरहू इमारतीमधील दुरुस्ती संदर्भात वारंवार तक्रार विविध विभागाकडून बांधकाम कक्षात येतात. यावर विद्यापीठ नियमानुसार कार्यवाही करण्यासाठी बराच कालावधी लागतो त्यामुळे सदरहू काम वेळेत होत नाही करिता शासनाच्या निर्णयानुसार विद्यापीठाच्या आवारातील तसेच विभागीय केंद्राच्या इमारतीचे वार्षिक देखभाल दुरुस्तीचे रु. 1.80 कोटीचे अंदाजपत्रक तयार केले आहे. प्रशासकीय अंदाजपत्रके हे वर्षभराचे आहे. कामाच्या निकडीनुसार तांत्रिक अंदाजपत्रक तयार करुन योग्य त्या स्तरावर मान्यता घेवून निविदेनुसार निवड झालेल्या ठेकेदार यांच्याकडून सदरहू काम करुन घेण्यात येईल. करिता सदरहू अंदाजपत्रक मा.बांधकाम समिती सदस्यांच्या विचारार्थ व प्रशासकीय मान्यतेस्तव तसेच सदरहू काम निविदा काढून देण्यास मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव सविनय सादर)<br>**बांधकाम समिती ठराव क्र. अ/400/2015/03.4** (दिनांक 6 मे 2015)<br>विद्यापीठ आवारातील व विभागीय केंद्रावरील इमारतीचे वार्षीक देखभाल दुरुस्तीसाठीच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय मान्यतेच्या प्रस्तावावर समिती सदस्यांनी सविस्तर चर्चा करुन खालीलप्रमाणे निर्णय घेतला की,<br>(1) अशा प्रकारची कामे ज्या संस्थेत, शासकीय कार्यालयात केली जात आहेत त्यांच्याकडून त्यांनी केलेल्या निविदेच्या प्रती मागवाव्यात व त्याचा अभ्यास करुन निविदा तयार करुन पुढील बांधकाम समितीत निविदा मसुदा मान्यतेसाठी सादर करावा.<br>(2) ई-निविदा पध्दतीचा अवलंब करुन सर्वात कमी दर असलेल्या ठेकेदारास व त्या दरात काम करण्याऱ्या ठेकेदारांचे एक पॅनल तयार करावे व पॅनलमधील प्रत्येक ठेकेदारास काम वाटून द्यावे असे ठरले. |

| | | |
|---|---|---|
| | | (Gazette : Ordance No. 40 (3 of 1993) 8.1 The building and works committee will be compentent to accord administrative approval and financial sanction to maintenance works subject to the availability of funds in the budget.)<br>(टिपणी : बांधकाम समितीचा ठराव क्र. अ/400/2015/03.4 नुसार विद्यापीठ आवारातील व विभागीय केंद्रावरील इमारतीचे वार्षीक देखभाल दुरुस्तीसाठीच्या कामासाठी पॅनल तयार करण्यासाठी निविदा तयार करुन वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्दी करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या. मुदतीपर्यत एकूण 12 (बारा) पुरवठाधारकांनी निविदा खरेदी केल्या होत्या त्यातून मुदतीपर्यत 06 (सहा) पुरवठाधारकांनी निविदा भरली होती. 02 (दोन) निविदा मुदतीनंतर आल्या होत्या त्या निविदा समितीसमोर निर्णयास्तव ठेवण्यात आल्या होत्या. समितीने याबाबत निविदेच्या अटी व शर्तीनुसार व जाहीरात नुसार दोन्ही निविदा न स्विकारण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे समितीने मुदतीपर्यत आलेल्या 06 (सहा) निविदेच्या तांत्रिक निविदा विद्यापीठाच्या तांत्रिक निविदा उघडण्याच्या समितीने निविदाधारकांसमोर उघडून तांत्रिक तौलनीक तक्ता तयार करण्यात आला. तांत्रिक तौलनीक तक्तानुसार सर्व निविदाधारकांची बैठक दि. 07 ऑगस्ट 2015 रोजी घेण्यात आली. सदरहू बैठकीत ज्या निविदाधारकांच्या निविदासोबत अपूर्ण कागदपत्रे व त्रृटी होत्या त्या समितीने निविदाधारकांना सांगितल्या. ज्या निविदाधारकांनी कागदपत्राची पूर्तता करण्याची विनंती केली होती त्यांना दि. 08.08.2015 पर्यत दुपारी 01.00 वाजेपर्यत कागदपत्रे सादर करण्याची मुदत देण्यात आली होती. त्यानुसार तांत्रिक तौलनीक तक्तानुसार निविदा उघडण्याच्या समितीने 03 निविदा अपात्र ठरवून उर्वरीत 03 (तीन) निविदाधारकांच्या निविदा पात्र ठरविल्या. समितीचे इतिवृत्त सोबत जोडले आहे. समितीच्या निर्णयानुसार पात्र ठरलेल्या निविदाधारकांच्या व्यापारी निविदा दि. 11 ऑगस्ट 2015 रोजी निविदाधारकांसमवेत उघडून दर तौलनीक तक्ता तयार करण्यात आला आहे. तांत्रिक निविदा उघडण्याच्या समितीचे इतिवृत्त व व्यापारी निविदा दर तौलनीक तक्ता बांधकाम समिती सदस्यांच्या निर्णयास्तव सविनय सादर.)<br>**<u>बांधकाम समिती ठराव क्र. अ/400/2015/08.1</u>** <u>(दिनांक 24 ऑगस्ट 2015)</u><br>विद्यापीठाच्या आवारातील व विभागीय केंद्रावरील इमारतीचे वार्षीक देखभाल दुरुस्तीसाठीच्या कामासाठी मागविण्यात आलेल्या निविदेच्या तांत्रिक निविदा व व्यापारी निविदा तौलनीक तक्तावर समिती सदस्यांनी सविस्तर चर्चा करुन दि. 07 ऑगस्ट 2015 रोजी झालेल्या निविदा उघडण्याच्या समिती बैठकीचे इतिवृत्तास मान्यता देवून समितीने असा निर्णय घेतला की तौलनीक तक्तानुसार सर्वात कमी दर असलेले मे. जगदीश डी.पवार, नाशिक ह्यांनी सार्वजनीक बांधकाम विभाग यांच्या दरसुचीवर 0.1 टक्के कमी दराचे असल्याने त्याना सदरहू कामाचा आदेश निर्गमित करुन निविदेच्या अटी व शर्तीनुसार करार करण्यात यावा तसेच त्याच दरात उर्वरीत ठेकेदार जर हे काम करण्यास तयार असल्यास त्यांना ह्या कामाच्या पॅनलमध्ये समाविष्ट करुन, नियुक्ती आदेश देवून निविदेच्या अटी व शर्तीनुसार करार करण्यात यावा व आवश्यकतेनुसार कामाचे वाटपाचे नियोजन करावे असे सर्वानुमते ठरले. सदरहू निर्णय मा.व्यवस्थापन मंडळाच्या पुढील बैठकीत कार्योत्तर मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.<br>(Gazette : Ordance No. 40 (3 of 1993) 7.3.2 The selection of the contractor for a particular job shall be made by the building and works committee.)<br>**व्य.मं.ठराव: विद्यापीठ आवारातील व विभागीय केंद्रावरील इमारतीचे वार्षीक देखभाल दुरुस्तीसाठीच्या रुपये 1.80 कोटीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता व वार्षिक देखभाल दुरुस्तीची निविदा प्रक्रिया बाबत केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |
| | 151.4.4<br>बां.स.बैठक<br>400/2015/03.5<br>400/2015/08.2 | विद्यापीठ आवारातील व विभागीय केंद्रावरील विद्युत बाबींसाठी वार्षिक देखभाल दुरुस्तीसाठीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता व वार्षिक देखभाल दुरुस्तीची निविदा काढण्याची बाब विचारार्थ.<br>(टिपणी : विद्यापीठ आवारातील काही इमारतींना बांधकाम होऊन बरेच वर्षे झाले आहेत त्यामुळे इमारतीमधील विद्युत बाबींदुरुस्ती संदर्भात वारंवार तक्कार विविध विभागाकडून बांधकाम कक्षात येतात. यावर विद्यापीठ नियमानुसार कार्यवाही करण्यासाठी बराच कालावधी लागतो त्यामुळे सदरहू काम वेळेत होत नाही करिता शासनाच्या निर्णयानुसार विद्यापीठाच्या आवारातील तसेच विभागीय केंद्राच्या इमारतीचे वार्षिक देखभाल दुरुस्तीचे रु.39 लाखाचे अंदाजपत्रक तयार केले आहे. सदरहू प्रशासकीय अंदाजपत्रके हे वर्षभराचे आहे. कामाच्या निकडीनुसार तांत्रिक अंदाजपत्रक तयार करुन योग्य त्या स्तरावर मान्यता घेवून निविदेनुसार निवड झालेल्या ठेकेदार यांच्याकडून सदरहू काम करुन |

घेण्यात येईल. करिता सदरहू अंदाजपत्रक मा.बांधकाम समिती सदस्यांच्या विचारार्थ व प्रशासकीय मान्यतेस्तव तसेच सदरहू काम निविदा काढून देण्यास मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव सविनय सादर) (सोबत जोडलेले परिशिष्ट F1 )

**<u>बांधकाम समिती ठराव क्र. अ/400/2015/03.5</u>** <u>(दिनांक 6 मे 2015)</u>

विद्यापीठ आवारातील व विभागीय केंद्रावरील विद्युत बांबीसाठी वार्षीक देखभाल दुरुस्तीसाठीच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय मान्यतेच्या प्रस्तावावर समिती सदस्यांनी सविस्तर चर्चा करुन खालीलप्रमाणे निर्णय घेतला की

(1) अशा प्रकारची कामे ज्या संस्थेत, शासकीय कार्यालयात केली जात आहेत त्यांच्याकडून त्यांनी केलेल्या निविदेच्या प्रती मागवाव्यात व त्याचा अभ्यास करुन निविदा तयार करुन पुढील बांधकाम समितीत निविदा मसुदा मान्यतेसाठी सादर करावा.

(2) सदरहू ई-निविदा पध्दतीचा अवलंब करुन सर्वात कमी दर असलेल्या ठेकेदारास व त्या दरात काम करण्याऱ्या ठेकेदारांचे एक पॅनल तयार करावे व पॅनलमधील प्रत्येक ठेकेदार काम वाटून द्यावे असे ठरले. (Gazette : Ordance No. 40 (3 of 1993) 8.1 The building and works committee will be compentent to accord administrative approval and financial sanction to maintenance works subject to the availability of funds in the budget.)

(टिप्पणी : बांधकाम समितीचा ठराव क्र. अ/400/2015/03.5 नुसार विद्यापीठ आवारातील व विभागीय केंद्रावरील इमारतीचे वार्षीक देखभाल दुरुस्तीसाठीच्या कामासाठी पॅनल तयार करण्यासाठी निविदा तयार करुन वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्दी करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या. मुदतीपर्यंत एकूण 09 (नऊ) पुरवठाधारकांनी निविदा खरेदी केल्या होत्या त्यातून मुदतीपर्यंत 04 (चार) पुरवठाधारकांनी निविदा भरली होती. त्यामुळे समितीने मुदतीपर्यंत आलेल्या 04 (चार) निविदेच्या तांत्रिक निविदा विद्यापीठाच्या तांत्रिक निविदा उघडण्याच्या समितीने निविदाधारकांसमोर उघडून तांत्रिक तौलनीक तक्ता तयार करण्यात आला. तांत्रिक तौलनीक तक्तानुसार सर्व निविदाधारकांची बैठक दि. 07 ऑगस्ट 2015 रोजी घेण्यात आली. सदरहू बैठकीत ज्या निविदाधारकांच्या निविदासोबत अपूर्ण कागदपत्रे व त्रृटी होत्या त्या समितीने निविदाधारकांना सांगितल्या. ज्या निविदाधारकांनी कागदपत्राची पूर्तता करण्याची विनंती केली होती त्यांना दि. 08.08.2015 पर्यंत दुपारी 01.00 वाजेपर्यंत कागदपत्रे सादर करण्याची मुदत देण्यात आली होती. त्यानुसार तांत्रिक तौलनीक तक्तानुसार निविदा उघडण्याच्या समितीने 01 निविदा अपात्र ठरवून उर्वरीत 03 (तीन) निविदाधारकांच्या निविदा पात्र ठरविल्या. समितीचे इतिवृत्त सोबत जोडले आहे. समितीच्या निर्णयानुसार पात्र ठरलेल्या निविदाधारकांच्या व्यापारी निविदा दि. 11 ऑगस्ट 2015 रोजी निविदाधारकांसमवेत उघडून दर तौलनीक तक्ता तयार करण्यात आला आहे. तांत्रिक निविदा उघडण्याच्या समितीचे इतिवृत्त व व्यापारी निविदा दर तौलनीक तक्ता बांधकाम समिती सदस्यांच्या निर्णयास्तव सविनय सादर.)

**<u>बांधकाम समिती ठराव क्र. अ/400/2015/08.2</u>** <u>(दिनांक 24 ऑगस्ट 2015)</u>

विद्यापीठाच्या आवारातील व विभागीय केंद्रावरील विद्युत बांबीसाठी वार्षीक देखभाल दुरुस्तीसाठीच्या कामासाठी मागविण्यात आलेल्या निविदेच्या तांत्रिक निविदा व व्यापारी निविदा तौलनीक तक्तावर समिती सदस्यांनी सविस्तर चर्चा करुन दि. 07 ऑगस्ट 2015 रोजी झालेल्या निविदा उघडण्याच्या समिती बैठकीचे इतिवृत्तास मान्यता देवून समितीने असा निर्णय घेतला की तौलनीक तक्तानुसार सर्वात कमी दर असलेले मे. स्पेस एज इलेक्ट्रीकल्स, इचलकरंजी, जि.कोल्हापूर ह्यांनी सार्वजनीक बांधकाम विभाग यांच्या दरसुचीवर 0.0 टक्के दराचे (दरसुचीनुसार) असल्याने त्याना सदरहू कामाचा आदेश निर्गमित करुन निविदेच्या अटी व शर्तीनुसार करार करण्यात यावा तसेच त्याच दरात उर्वरीत ठेकेदार जर हे काम करण्यास तयार असल्यास त्यांना ह्या कामाच्या पॅनलमध्ये समाविष्ठ करुन नियुक्ती आदेश देवून निविदेच्या अटी व शर्तीनुसार करार करण्यात यावा व आवश्यकतेनुसार कामाचे वाटपाचे नियोजन करावे असे सर्वानुमते ठरले. सदरहू निर्णय मा.व्यवस्थापन मंडळाच्या पुढील बैठकीत कार्योत्तर मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.(Gazette : Ordance No. 40 (3 of 1993) 7.3.2 The selection of the contractor for a particular job shall be made by the building and works committee.)

**व्य.मं.ठराव: विद्यापीठ आवारातील व विभागीय केंद्रावरील विद्युत बाबींसाठी वार्षिक देखभाल दुरुस्तीसाठीच्या रुपये 39 लाखाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता व वार्षिक देखभाल दुरुस्तीची निविदा निविदा प्रक्रिया बाबत केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

| | | |
|---|---|---|
| | 151.4.5<br>400/2015/03.6<br>400/2015/08.2 | विद्यापीठ आवारातील विद्युत उपकरणे व मशनरी यांचे वार्षिक देखभाल दुरुस्तीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता व वार्षिक देखभाल दुरुस्तीची निविदा काढण्यास मान्यता.<br>(टिप्पणी: विद्यापीठ आवारातील विविध इमारतीमध्ये एसी, जनरेटर, इन्वर्टर इ. बसवून बरेच वर्षे झाले आहेत त्यामुळे सदरहू उपकरणे व मशनरी यांचे दुरुस्ती संदर्भात वारंवार तक्कार विविध विभागाकडून बांधकाम कक्षात येतात. यावर विद्यापीठ नियमानुसार कार्यवाही करण्यासाठी बराच कालावधी लागतो त्यामुळे सदरहू काम वेळेत होत नाही करिता शासनाच्या निर्णयानुसार विद्यापीठाच्या आवारातील तसेच विभागीय केंद्राच्या विद्युत उपकरणे व मशनरी यांचे वार्षिक देखभाल दुरुस्तीचे रु. 73 लाखाचे अंदाजपत्रक तयार केले आहे. सदरहू प्रशासकीय अंदाजपत्रके हे वर्षभराचे आहे. कामाच्या निकडीनुसार तांत्रिक अंदाजपत्रक तयार करुन योग्य त्या स्तरावर मान्यता घेवून निविदेनुसार निवड झालेल्या ठेकेदार यांच्याकडून सदरहू काम करुन घेण्यात येईल. करिता सदरहू अंदाजपत्रक मा.बांधकाम समिती सदस्यांच्या विचारार्थ व प्रशासकीय मान्यतेस्तव तसेच सदरहू काम निविदा काढून देण्यास मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव सविनय सादर) (सोबत जोडलेले परिशिष्ट G 1)<br>**<u>बांधकाम समिती ठराव क्र. अ/400/2015/03.6</u>** <u>(दिनांक 6 मे 2015)</u><br>विद्यापीठ आवारातील विद्युत उपकरणे व मशनरी यांचे वार्षीक देखभाल दुरुस्तीसाठीच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय मान्यतेच्या प्रस्तावावर समिती सदस्यांनी सविस्तर चर्चा करुन खालीलप्रमाणे निर्णय घेतला की<br>(1) अशा प्रकारची कामे ज्या संस्थेत, शासकीय कार्यालयात केली जात आहेत त्यांच्याकडून त्यांनी केलेल्या निविदेच्या प्रती मागवाव्यात व त्याचा अभ्यास करुन निविदा तयार करुन पुढील बांधकाम समितीत निविदा मसुदा मान्यतेसाठी सादर करावा.<br>(2) सदरहू ई-निविदा पध्दतीचा अवलंब करुन सर्वात कमी दर असलेल्या ठेकेदारास व त्या दरात काम करणाऱ्या ठेकेदारांचे एक पॅनल तयार करावे व पॅनलमधील प्रत्येक ठेकेदार काम वाटून द्यावे असे ठरले.(Gazette : Ordance No. 40 (3 of 1993) 8.1 The building and works committee will be compentent to accord administrative approval and financial sanction to maintenance works subject to the availability of funds in the budget.)<br>(टिप्पणी : बांधकाम समितीचा ठराव क्र. अ/400/2015/03.6 नुसार विद्यापीठ आवारातील व विभागीय केंद्रावरील विद्युत उपकरणे व मशनरी यांचे वार्षीक देखभाल वार्षीक देखभाल दुरुस्तीसाठीच्या कामासाठी पॅनल तयार करण्यासाठी निविदा तयार करुन वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्दी करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या. मुदतीपर्यत एकूण 12 (बारा) पुरवठाधारकांनी निविदा खरेदी केल्या होत्या त्यातून मुदतीपर्यत 06 (सहा) पुरवठाधारकांनी निविदा भरली होती. त्यामुळे समितीने मुदतीपर्यत आलेल्या 06 (सहा) निविदेच्या तांत्रिक निविदा विद्यापीठाच्या तांत्रिक निविदा उघडण्याच्या समितीने निविदाधारकांसमोर उघडून तांत्रिक तौलनीक तक्ता तयार करण्यात आला. तांत्रिक तौलनीक तक्तानुसार सर्व निविदाधारकांची बैठक दि. 07 ऑगस्ट 2015 रोजी घेण्यात आली. सदरहू बैठकीत ज्या निविदाधारकांच्या निविदासोबत अपूर्ण कागदपत्रे व त्रूटी होत्या त्या समितीने निविदाधारकांना सांगितल्या. ज्या निविदाधारकांनी कागदपत्राची पूर्तता करण्याची विनंती केली होती त्यांना दि. 08.08.2015 पर्यत दुपारी 01.00 वाजेपर्यत कागदपत्रे सादर करण्याची मुदत देण्यात आली होती. त्यानुसार तांत्रिक तौलनीक तक्तानुसार निविदा उघडण्याच्या समितीने सर्व 06 (सहा) निविदाधारकांच्या निविदा पात्र ठरविल्या. समितीचे इतिवृत्त सोबत जोडले आहे. समितीच्या निर्णयानुसार पात्र ठरलेल्या निविदाधारकांच्या व्यापारी निविदा दि. 11 ऑगस्ट 2015 रोजी निविदाधारकांसमवेत उघडून दर तौलनीक तक्ता तयार करण्यात आला आहे. तांत्रिक निविदा उघडण्याच्या समितीचे इतिवृत्त व व्यापारी निविदा दर तौलनीक तक्ता बांधकाम समिती सदस्यांच्या निर्णयास्तव सविनय सादर.)<br>**<u>बांधकाम समिती ठराव क्र. अ/400/2015/08.2</u>** <u>(दिनांक 24 ऑगस्ट 2015)</u><br>विद्यापीठाच्या आवारातील व विभागीय केंद्रावरील विद्युत उपकरणे व मशनरी यांचे वार्षीक देखभाल दुरुस्तीसाठीच्या कामासाठी कामासाठी मागविण्यात आलेल्या निविदेच्या तांत्रिक निविदा व व्यापारी निविदा तौलनीक तक्तावर समिती सदस्यांनी सविस्तर चर्चा करुन दि. 07 ऑगस्ट 2015 रोजी झालेल्या निविदा उघडण्याच्या समिती बैठकीचे इतिवृत्तास मान्यता देवून समितीने असा निर्णय घेतला की तौलनीक तक्तानुसार (1) वातानुकुलीत यंत्रनेसाठी मे.जे.के.रिफ्रेजरेशन, नाशिक व मे.गणेश रिफ्रेजरेशन, नाशिक या दोन्ही ठेकेदांराचे वेगवेगळ्या कंपनीचे AC साठी दर आलेले आहेत त्यात दोघामध्ये खालीलप्रमाणे सर्वात कमी दर निश्चित करण्यात आले त्या दरात दोन्ही ठेकेदार काम करण्यास तयार असतील तर त्यांना दोघांना आवश्यकतेनुसार काम करण्याचे आदेश देवून निविदेनुसार |

करार करण्यात यावा.

| अ.क्र. | एसी मेक | प्रती ए सी साठी एकवेळचा देखभालीचा दर |
|---|---|---|
| 01 | Cassette Type LG 3 T | 420/- |
| 02. | Cassette Type Carrier 5 T | 780/- |
| 03. | Cassette Type Dycine 2 T | 330/- |
| 04. | Split Type LG 2 T | 210/- |
| 05. | Split Type Loyad 2 T | 330/- |
| 06. | Split Type Hire 1.5 T | 330/- |
| 07. | Split Type Voltas 2 T | 231/- |
| 08. | Split Type Dycine 1.5 T | 170/- |
| 09. | Split Type Blue star 19 T | 850/- |
| 10. | Split Type Samsung 1.5 T | 208/- |
| 11. | Split Type Kenstar 2 T | 234/- |
| 12. | Split type Cruse 1.5 T | 330/- |
| 13. | Split Type Carrier 4.5 T | 420/- |
| 14. | Window Type Onida 1.5 T | 233/- |

(2) वॉटर कुलर साठी तौलनीक दरानुसार सर्वात कमी दर असलेले ठेकेदार मे. गणेश रिफ्रेजरेश, नाशिक यांना प्रती वॉटर कुलर एक वेळेसाठी रु. 183/- या दराने कामाचा आदेश देवून करार करण्यात यावा. तसेच मे. जे.के.रिफ्रेजरेशन, नाशिक हे निविदाधारक सुध्दा रु. 183/- या दरात काम करण्यास तयार असल्यास त्यांनाही पॅनलमध्ये समाविष्ठ करण्यात यावे. (3) एअर कुलर साठी मे. जे.के.रिफ्रेजरेशन, नाशिक या ठेकेदारांच दर भरले आहेत सदरहू दर योग्य आहेत त्यामुळे त्यांना प्रती एअर कुलरसाठी एक वेळेस रु. 240/- या दराने कामाचा आदेश देवून करार करण्यात यावा. (4) सोलर वॉटर सिस्टीमसाठी तौलनीक तक्त्यात नमुद केलेले दर समितीला बाजार भावापेक्षा जास्त वाटत असल्यामुळे समितीने असा निर्णय घेतला की जर संबंधीत ठेकेदार हे इतर उपकरणेप्रमाणे प्रति पॅनल सर्व्हिसिंग फी व प्रती पहाणी फी या प्रमाणे काम दिल्यास कमी खर्च येईल, यासाठी बांधकाम समितीचे सचिव यांनी संबंधीत ठेकेदार याबाबत विचारणा केली असता त्यातील (1) मे. युनिक सोलर सिस्टीम नाशिक व (2) मे. श्री एंटरप्राईजेस, नाशिक यांनी सोलर वॉटर सिस्टीमसाठी प्रती पॅनल सर्व्हिसिंगसाठी रु. 200/- व प्रति पहाणी फी रु. 700/- या दराने दिली त्यास समिती मान्यता देवून दोन्ही वरील दोन्ही ठेकेदारांचे पॅलन तयार करुन नियुक्तीपत्र देण्यात यावे व निविदेच्या अटी व शर्तीनुसार दर करार करण्यात यावा. (5) लिफ्ट कोने मेक, वॉटर प्यूरीफायर व वॉटर बॉईलर च्या वार्षिक देखभाल दुरुस्तीसाठी एकही निविदा प्राप्त झालेली नाही करिता सदरहू काम हे स्थानिक ठेकेदार अथवा सस्था यांच्याकडून आवश्यकतेनुसार विद्यापीठ नियमानुसार करण्यात यावे किंवा वरील उपकरणासाठी भरलेल्या निविदाधारकांपैक जो निविदा धारक हे काम करण्यास तयार असल्यास त्यांच्याकडून सदरहू काम करुन घ्यावे असे सर्वानुमते ठरले. सदरहू निर्णय मा.व्यवस्थापन मंडळाच्या पुढील बैठकीत कार्योत्तर मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.

(Gazette : Ordance No. 40 (3 of 1993) 7.3.2 The selection of the contractor for a particular job shall be made by the building and works committee.)

**व्य.मं.ठराव: विद्यापीठ आवारातील विद्युत उपकरणे व मशनरी यांचे वार्षिक देखभाल दुरुस्तीच्या रुपये 73 लाख अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता व वार्षिक देखभाल दुरुस्तीची निविदा प्रक्रिया बाबत केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

151.4.6
बां.स.बैठक
400/2015/08.4

विद्यापीठ आवारातील व विभागीय केंद्रावरील विविध बांधकामासाठी वास्तुतज्ञांचे पॅनल तयार करण्यासाठी मागविण्यात आलेल्या निविदेच्या तांत्रिक निविदा तौलनिक तक्ता व व्यापारी निविदा दर तौलनिक तक्ता विचारार्थ सादर.

(टिप्पणी : बांधकाम समितीचा ठराव क्र. अ/400/2015/03.7 नुसार विद्यापीठ आवारातील व विभागीय केंद्रावरील विविध बांधकामासाठी वास्तूतज्ञांचे पॅनल तयार करण्यासाठी निविदा तयार करुन वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्दी करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यात (1) Civil Consultants साठी मुदतीपर्यंत एकूण 11 तज्ञांनी निविदा खरेदी केल्या होत्या त्यातून मुदतीपर्यत 11 निविदाधारकांनी निविदा भरली होती. (2) Electrical Consultants साठी मुदतीपर्यंत एकूण 02 तज्ञांनी निविदा खरेदी केल्या होत्या त्यातून मुदतीपर्यत 02 निविदाधारकांनी निविदा भरली होती. (3) Interior साठी मुदतीपर्यंत एकूण 21 तज्ञांनी निविदा खरेदी केल्या होत्या त्यातून मुदतीपर्यत 12 निविदाधारकांनी

| | | |
|---|---|---|
| | | निविदा भरली होती. (4) Architecure साठी मुदतीपर्यंत एकूण 20 तज्ञांनी निविदा खरेदी केल्या होत्या त्यातून मुदतीपर्यंत 12 निविदाधारकांनी निविदा भरली होती. (5) Stuctureal Consultants साठी मुदतीपर्यंत एकूण 10 तज्ञांनी निविदा खरेदी केल्या होत्या त्यातून मुदतीपर्यंत 08 निविदाधारकांनी निविदा भरली होती. मुदतीनंतर (1) Civil Consultants तज्ञांनासाठी 01 (2) Interior तज्ञांनासाठी 02 (3) Architecure 1 तज्ञांनासाठी 01 अशा एकूण 04 निविदा प्राप्त झाल्या होत्या. निविदा मुदतीनंतर आल्या होत्या त्या निविदा समितीसमोर निर्णयास्तव ठेवण्यात आल्या होत्या. समितीने याबाबत निविदेच्या अटी व शर्तीनुसार व जाहीरात नुसार चारही निविदा नस्विकारण्याचा निर्णय घेतला. मुदतीत प्राप्त झालेल्या निविदा त्याच दिवशी दुपारी 02.30 निविदाधारकांसमोर उघडून तांत्रिक तौलनीक तक्ता तयार करण्यात आला. तांत्रिक तौलनीक तक्तानुसार (1) Civil Consultants साठी 11 निविदाधारकांपैकी 02 निविदा अपात्र व 09 निविदा पात्र ठरल्या. (2) Electrical Consultants साठी दोन्ही निविदा पात्र ठरल्या. (3) Interior साठी 12 निविदाधारकांपैकी 07 निविदा अपात्र व 05 निविदा पात्र ठरल्या. (4) Architecure साठी 12 निविदाधारकांपैकी 05 निविदा अपात्र व 07 निविदा पात्र ठरल्या. (5) Stuctureal Consultants साठी 08 निविदाधारकांपैकी 03 निविदा अपात्र व 05 निविदा पात्र ठरल्या. पात्र ठरलेल्या निविदा धारकांच्या व्यापारी निविदा दि. 20.08.2015 रोजी उघडण्यात येणार आहेत. त्यामुळे सदरहू व्यापारी निविदेंचा दर तौलनीक तक्ता व तांत्रिक तौलनीक तक्ता दि. 24.08.2015 रोजी समितीला सादर करण्यात येतील. त्यावर निर्णय घेण्याबाबतचा विषय बांधकाम समिती सदस्यांच्या निर्णयास्तव सविनय सादर.)<br>**<u>बांधकाम समिती ठराव क्र. अ/400/2015/08.4</u>** <u>(दिनांक 24 ऑगस्ट 2015)</u><br>विद्यापीठाच्या आवारातील व विभागीय केंद्रावरील विविध बांधकामासाठी तज्ञांचे पॅनल तयार करण्याच्या कामासाठी मागविण्यात आलेल्या निविदेच्या तांत्रिक निविदा व व्यापारी निविदा तौलनीक तक्तावर समिती सदस्यांनी सविस्तर चर्चा केली. चर्चेत समिती सदस्यांनी या तज्ञ पॅनल कडून विद्यापीठ कोणकोणती कामे करुन घेणार आहेत यावर कार्यकारी अभियंता यांनी खालीलप्रमाणे तज्ञ पॅनल कडून खालीलप्रमाणे कामे करून घेणार आहोत.<br>01) कामाचे नकाशे तयार करणे.<br>02) कामाचे अंदाजपत्रक तयार करणे व योग्य त्या स्तरावर त्यास मंजूरी घेणे.<br>03) कामाची निविदा तयार करणे.<br>04) कामाच्या निविदेची तपासणी करणे.<br>05) कामाची देखभाल करणे.<br>06) कामाची तपासणी करणे.<br>यावर समिती सदस्यांनी असा निर्णय घेतला की तौलनीक तक्तानुसार (1) Civil Consultants साठी सर्वात कमी दर मे माहिमतुरा कनस्ल्टन्ट, मुंबई याचा अनुक्रमे 0.75 टक्का व 2.00 टक्का आहे. (2) Electrical Consultants साठी सर्वात कमी दर मे संतोष नामदेव शेखर, याचा अनुक्रमे 2.5 टक्का (3) Interior साठी साठी सर्वात कमी दर मे साई प्रोजेक्ट कंसल्टंट याचा अनुक्रमे 2.00 टक्का आहे. (4) Architecure साठी साठी सर्वात कमी दर मे माहिमतुरा कनस्ल्टन्ट, मुंबई याचा अनुक्रमे 2.00 टक्का व 2.00 टक्का आहे. (5) Stuctureal Consultants साठी सर्वात कमी दर मे माहिमतुरा कनस्ल्टन्ट, मुंबई याचा अनुक्रमे 1.00 टक्का आहे. वरीलप्रमाणे सर्वात कमी दर असलेल्या तज्ञांना नियुक्ती पत्र देवून निविदेच्या अटी व शर्तीनुसार दरकरार करण्यात यावा तसेच सर्वात कमी आलेल्या दरात जर इतर तज्ञ काम करण्यास तयार असतील तर त्यांनाही पॅनलमध्ये समाविष्ठ करुन नियुक्ती पत्र देण्यात यावे व निविदेच्या अटी व शर्तीनुसार दर करार करण्यात यावा व त्यांनाही आवश्यकतेनुसार कामाचे वाटप करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले. सदरहू निर्णय मा.व्यवस्थापन मंडळाच्या पुढील बैठकीत कार्योत्तर मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.<br>**व्य.मं.ठराव: विद्यापीठ आवारातील व विभागीय केंद्रावरील विविध बांधकामासाठी वास्तुतज्ञांचे पॅनल तयार करण्यास मान्यता देण्यात आली. व तांत्रिक निविदा तौलनिक तक्ता व व्यापारी निविदा दर आवश्यकतेनुसार, निविदेतील अटी व शर्तीनुसार कामाचे वाटप करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |
| | 151.4.7<br>बांधकाम विभाग<br>400/2015/04.1<br>वि.स.बैठक<br>5.4.10 | विद्यापीठाच्या परिक्षा गोडाऊन मध्ये पॅलेट रॅकेट बसवण्याच्या कामाच्या तांत्रिक व व्यापारी निविदा तौलनिक तक्ता विचारार्थ.<br>(टिप्पणी : विद्यापीठाच्या प्रांगणात परीक्षा गोडाऊनमध्ये पॅलेट रॅक बसविण्याच्या कामासाठी शासन निर्णयाप्रमाणे ई-निविदा प्रणाली वापरून दि.11 फेब्रुवारी 2015 रोजी वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्दी करुन |

| | | |
|---|---|---|
| | | निविदा मागविण्यात आल्या होत्या. मुदतीपर्यत एकूण 07 (सात) पुरवठाधारकांनी निविदा खरेदी केल्या होत्या त्यातून मुदतीपर्यत 04 (चार) पुरवठाधारकांनी ई-निविदाव्दारे निविदा भरली होती. नियमानुसार सदरहू निविदा विद्यापीठाच्या ई-निविदा उघडण्याच्या समितीसमोर उघडून सर्व निविदा धारकांच्या तांत्रिक निविदांची प्रिंट काढण्यात आली व त्याचा तौलनीक तक्ता तयार करुन तांत्रिक निविदांची तपासणी केली असता 04 (चार) पुरवठाधारकांपैकी मे. समर स्टील इंस्टि.जळगांव यांनी निविदा अपात्र ठरवून उर्वरीत 03 (तीन) पुरवठाधारक तांत्रिक निविदेत पात्र ठरले. त्यानुसार तांत्रिक निविदेत पात्र ठरलेल्या पुरवठाधारकांच्या व्यापारी निविदा समिती सदस्यांसमोर उघडून तौलनीक तक्ता तयार करण्यात आला. तौलनीक तक्तानुसार सर्वात कमी दर मे. Sumech Storage Systems, Pune यांनी संपूर्ण Pallet Racking सिस्टीम रु. 40,65,774/- सर्व करासहीत दर आलेला आहे. सर्वात कमी दर असलेले मे. Sumech Storage Systems, Pune यांना मा.कुलगुरु यांच्या मान्यतेनुसार दिलेल्या दरापेक्षा अजून दर कमी करण्याबाबत कळविले होते त्यानुसार त्यांनी दर कमी करण्याबाबत पत्र दिलेले आहे. सदरहू पत्र, तांत्रिक व व्यापारी निविदा तौलनीक तक्ता बांधकाम समिती सदस्यांच्या निर्णयास्तव सविनय सादर.) (सोबत जोडलेले परिशिष्ट I 1 ते I 3)<br>**<u>बांधकाम समिती ठराव क्र. अ/400/2015/04.1</u>** <u>(दिनांक 6 मे 2015)</u><br>विद्यापीठाच्या परीक्षा गोडाऊनमध्ये पॅलेट रॅक बसविण्याच्या कामाच्या तांत्रिक व व्यापारी निविदा तौलनीक तक्तावर समिती सदस्यांनी सविस्तर चर्चा करुन असा निर्णय घेतला की तौलनीक तक्तानुसार सर्वात कमी दर असलेले मे. Sumech Storage Systems, Pune ह्यांनी त्यांचे दि. 05 मे 2015 चे पत्रानुसार एकूण रक्कम रु. 40,65,774/- वर दिलेली सुट रु. 12000/- वजा जाता रु. 40,53,771/- सर्व करासहीत निविदेच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून कार्य आदेश निर्गमित करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले व मा.व्यवस्थापन मंडळ यांच्या कार्योत्तर मान्यतेसाठी सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला.<br>**वित्त समिती ठराव क्र. 5.4.10** – बांधकाम समितीच्या ठरावास मान्यता देण्यात आली. त्यास व्यवस्थापन मंडळाच्या मंजूरीस्तव शिफारशीसाठी सादर.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारशीनुसार विद्यापीठाच्या परिक्षा गोडाऊन मध्ये पॅलेट रॅकेट बसवण्याच्या कामाच्या तांत्रिक व व्यापारी निविदा तौलनिक तक्त्यानुसार झालेला रुपये 40,53,771/- खर्चास दिलेल्या मान्यतेची नोंद घेण्यात आली.** |
| | 151.4.8<br>बांधकाम विभाग<br>400/2015/4.3 | विद्यापीठाच्या कोल्हापूर विभागीय केंद्राच्या इमारत दुरुस्ती कामाच्या तांत्रिक व व्यापारी निविदा तौलनिक तक्ता विचारार्थ.<br>(टिप्पणी : विद्यापीठाच्या कोल्हापूर विभागीय केंद्राच्या इमारत दुरुस्ती कामासाठी शासन निर्णयाप्रमाणे ई-निविदा प्रणाली वापरून दि.14 मार्च 2015 रोजी वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्दी करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या. मुदतीपर्यत एकूण 03 पुरवठाधारकांनी निविदा खरेदी केल्या होत्या त्यातून मुदतीपर्यत तीनही पुरवठाधारकांनी ई-निविदाव्दारे निविदा भरली होती. नियमानुसार सदरहू निविदा विद्यापीठाच्या ई-निविदा उघडण्याच्या समितीसमोर उघडून सर्व निविदा धारकांच्या तांत्रिक निविदांची प्रिंट काढण्यात आली व त्याचा तौलनीक तक्ता तयार करुन तांत्रिक निविदांची तपासणी केली असता तीनही पुरवठाधारक तांत्रिक निविदेत पात्र ठरले. त्यानुसार तांत्रिक निविदेत पात्र ठरलेल्या पुरवठाधारकांच्या व्यापारी निविदा समिती सदस्यांसमोर उघडून तौलनीक तक्ता तयार करण्यात आला. तौलनीक तक्तानुसार सर्वात कमी दर मे. Nikhil Parikh, Kolhapur यांनी कोल्हापूर विभागीय केंद्राच्या दुरुस्ती निविदेत नमुद केलेल्या रु.17,48,991/- रक्कमेपेक्षा 5.55 टक्के अधिकने काम करण्याबाबत निविदा भरलेले आहे. सर्वात कमी दर असलेले मे. Nikhil Parikh, Nashik यांना मा.कुलगुरु यांच्या मान्यतेनुसार दिलेल्या दरापेक्षा अजून दर कमी करण्याबाबत कळविले होते त्यानुसार त्यांनी दर कमी करण्याबाबत पत्र दिलेले आहे. सदरहू पत्र, तांत्रिक निविदा व व्यापारी निविदा तौलनीक तक्ता बांधकाम समिती सदस्यांच्या निर्णयास्तव सविनय सादर.) (सोबत जोडलेले परिशिष्ट K 1 ते K 3)<br>**<u>बांधकाम समिती ठराव क्र. अ/400/2015/04.3</u>** <u>(दिनांक 6 मे 2015)</u><br>विद्यापीठाच्या कोल्हापूर विभागीय केंद्राच्या इमारत दुरुस्ती कामाच्या तांत्रिक व व्यापारी निविदा तौलनीक तक्तावर समिती सदस्यांनी सविस्तर चर्चा करुन असा निर्णय घेतला की तौलनीक तक्तानुसार सर्वात कमी दर असलेले मे. Nikhil Parikh, Kolhapur. ह्यांनी त्यांचे दि. 04 मे 2015 चे पत्रानुसार एकूण कामाचे अंदाजपत्रक रु. 17,48,991/- रक्कमेपेक्षा 5.55 टक्के अधिकने ऐवजी 4.95 टक्के अधिकने निविदेच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून कार्य आदेश निर्गमित करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले व मा.व्यवस्थापन मंडळ यांच्या कार्योत्तर मान्यतेसाठी सादर करण्याचा निर्णय घेण्यात |

| | | |
|---|---|---|
| | | आला.(Gazette : Ordance No. 40 (3 of 1993) 7.3.2 The selection of the contractor for a particular job shall be made by the building and works committee.)<br>(Gazette : Ordance No. 40 (3 of 1993) 8.1 The building and works committee will be compentent to accord administrative approval and financial sanction to maintenance works subject to the availability of funds in the budget.)<br>**वित्त समिती ठराव क्र. 5.4.10** – बांधकाम समितीच्या ठरावास मान्यता देण्यात आली. त्यास व्यवस्थापन मंडळाच्या मंजूरीस्तव शिफारशीसाठी सादर.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीच्या शिफारशीनुसार विद्यापीठाच्या कोल्हापूर विभागीय केंद्राच्या इमारत दुरुस्ती कामाच्या तांत्रिक व व्यापारी निविदा तौलनिक तक्त्यानुसार रुपये 17,48,991/- ऐवजी 4.95 टक्के अधिक निविदेच्या अटी व शर्तीला अधिन राहून कार्य आदेश निर्गमित करण्यास दिलेल्या मान्यतेची नोंद घेण्यात आली.** |
| | 151.4.9<br>बांधकाम विभाग | विद्यापीठ प्रांगणात तसेच नाशिक व पुणे विभागीय केंद्रावर बसवण्यात आलेल्या सी.सी.टि.व्ही कॅमेरा खर्च रुपये 11,65,000/- कार्योत्तर मान्यता व इतर उर्वरित विभागीय केंद्रावर सी.सी.टि.व्ही कॅमेरे बसवण्यासाठी येणारा अंदाजीत खर्च रुपये 6,50,000/- असे एकूण रुपये 18,00,000/- खर्चास मान्यता मिळण्याची बाब विचारार्थ सादर.<br>(टिपण्णी : विद्यापीठ आवारात सी सी टी व्ही. कॅमेरे बसविण्यासाठी रु. 8,26,015/- मा.कुलगुरु यांची मान्यता घेवून विद्यापीठ व शासनाच्या नियमानुसार ई-निविदा प्रक्रिया करुन सर्वात कमी दर असलेले मे. रिध्दी एंटरप्राईजेस, नाशिक यांना खरेदी समितीच्या मान्यतेनुसार रु. 7,26,232/- काम सुरु करण्याचा आदेश देण्यात आला होता. सदरहू काम सुरु असतांना निविदेतील काही बाबींमध्ये बदल व पुणे व नाशिक विभागीय केंद्र कार्यालयात बसविण्यात आलेले सी सी टी व्ही कॅमरे यांच्यासाठी निविदे व्यतिरिक्त 3,50,209/- इतका जादा खर्च झालेला आहे. असा एकूण रु. 10,76,441/- इतका खर्च झालेला आहे. यासाठी 11,65,000/- इतक्या रक्कमेच्या सुधारित मान्यतेचा प्रस्तावास व्यवस्थापन मंडळाच्यावतीने मा.कुलगुंरु यांनी मान्यता दिली आहे. पुणे व नाशिक विभागीय केंद्राप्रमाणेच इतर उर्वरीत सहा विभागीय केंद्रावर सुध्दा सी सी टी व्ही बसविणे आवश्यक असल्याने आहे त्याच ठेकेदाराकडून निविदेच्या दरानुसार काम करणे प्रस्तावित आहे त्यासाठीचा सुसुधारित प्रशासकीय व वित्तीय मान्यतेचा रक्कम रु. 18 लाख चा प्रस्ताव वित्त समिती व व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यास गा.कुलगुरु यांनी मान्यता दिली आहे. सदरहू प्रस्ताव समिती समोर सविनय सादर.)<br>**वित्त समिती ठराव क्र. 5.4.21** – विद्यापीठ प्रांगणात तसेच नाशिक व पुणे विभागीय केंद्रावर बसवण्यात आलेल्या सी.सी.टी.व्ही कॅमेरा खर्च रु.11,65,000/- कार्योत्तर मान्यता व उर्वरित सर्व विभागीय केंद्रावर सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसवण्यासाठी येणारा अंदाजीत खर्च रु.6,50,000/- अशा एकूण रु.18 लक्ष खर्चास मान्यता देण्यात आली. त्यास व्यवस्थापन मंडळाच्या मंजूरीस्तव शिफारशीसाठी सादर.<br>**व्य.मं.ठराव: वित्तसमितीच्या शिफारशीनुसार विद्यापीठ प्रांगणात तसेच नाशिक व पुणे विभागीय केंद्रावर बसवण्यात आलेल्या सी.सी.टि.व्ही कॅमेरा खर्च रुपये 11,65,000/- कार्योत्तर मान्यता व इतर उर्वरित विभागीय केंद्रावर सी.सी.टि.व्ही कॅमेरे बसवण्यासाठी येणारा अंदाजीत खर्च रुपये 6,50,000/- असे एकूण रुपये 18,00,000/- खर्चास मान्यता देण्यात आली.** |
| | 151.4.10<br>वि.स.बैठक<br>5.4.11 | मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेच्या विविध शिक्षणक्रमांच्या विकसन/पुनर्रचनेसाठी विद्याशाखेच्या सन 2015-16 च्या नवीन शिक्षणक्रमाच्या निर्मिती खर्चासाठी रु.5 कोटी प्रशासकीय मान्यता देण्याची बाब विचारार्थ.<br>(टिपणी: मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेमार्फत सन 2015-16 या वर्षात खालील शिक्षणक्रमांच्या विकसनाचे/पुनर्रचनेचे काम हाती घेण्यात आलेले आहे. यासाठी तज्ज्ञ सल्लागारांची निवड, त्यांच्या बैठका, लेखन साहित्यासाठी द्यावे लागणारे मानधन, पुस्तक छपाई, यासाठी खर्च अपेक्षित आहे.<br>1) बी.ए. (द्वितीय वर्ष) शिक्षणक्रम पुनर्रचना 2) बी.ए. (तृतीय वर्ष) शिक्षणक्रम पुनर्रचना<br>3) एम.ए. शिक्षणक्रम विकसन 4) प्रथम वर्ष बी.ए. जनसंज्ञापन व वृत्तपत्रविद्या पुनर्रचना<br>5) एम.ए. पब्लिक अँडमिनिस्ट्रेशन 6) एम.ए. जनसंज्ञापन व वृत्तपत्रविद्या पुनर्रचना<br>7) MSW<br>वरील खर्च विद्याशाखेच्या सन 2015-16 मध्ये केलेल्या अंदाजपत्रकातील नवीन शिक्षणक्रमांची निर्मिती |

| | | |
|---|---|---|
| | | या शिर्षकाखाली खर्ची टाकण्यात येणार आहे. या लेखाशिर्षकात रू. 40,00,000/- इतकी तरतूद करण्यात आली आहे. यासंदर्भात वित्त समितीने खालीलप्रमाणे ठराव संमत केलेला आहे.<br>**वि.स.ठराव-** मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेच्या विविध शिक्षणक्रमांच्या विकसन / पुर्नरचनेसाठी सन 2015-16 च्या अंदाजपत्रकातील नवीन शिक्षणक्रमांची निर्मिती खर्चासाठी खर्चासाठी रु. 5 कोटी प्रशासकीय मान्यता देण्यास व्यवस्थापन मंडळास शिफारशीसह सादर.<br>**व्य.मं.ठराव: मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेच्या विविध शिक्षणक्रमांच्या विकसन/पुर्नरचनेसाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली.** |
| | 151.4.11<br>वि.स.बैठक<br>5.4.12 | कृषि विज्ञान विद्याशाखेच्या 8 शिक्षणक्रमांची पुर्नरचना करण्यासाठी येणाऱ्या रु.11,45,500/- खर्चासाठीची बाब विचारार्थ.<br>(टिपणी: कृषि विज्ञान विद्याशाखेमार्फत 8 शिक्षणक्रमांची पुर्नरचना करण्याचे काम जानेवारी 2015 पासून सुरु आहे. तसेच पुरवणी पुस्तिका विकसित करण्यात येत असून लेखन मानधन, संपादन मानधन, टायपिंग मानधन इ. साठी रु.11,45,500/- खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास मंजुरी मिळणेस प्रस्ताव सादर.<br>**वि.स.ठराव** - कृषि विज्ञान विद्याशाखेच्या 8 शिक्षणक्रमांचे रिव्हिजन करण्यास येणाऱ्या रु.11,45,500/- खर्चास मान्यता देण्यात आली त्यास व्यवस्थापन मंडळाच्या मंजूरीस्तव शिफारशीसह सादर.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारशीनुसार कृषि विज्ञान विद्याशाखेच्या 8 शिक्षणक्रमांची पुर्नरचना करण्यासाठी येणाऱ्या रु.11,45,500/- खर्चास मान्यता देण्यात आली.** |
| | 151.4.12<br>वि.स.बैठक<br>5.4.13 | सन 2015-16 मधील अंदाजपत्रकीय शिर्षकामधील मूळ लेखाशिर्षकातील आर्थिक तरतूदीमध्ये वाढ करणेची बाब विचारार्थ.<br>(टिपणी: विद्यापीठाला 1 एप्रिल 2015 पासून समान लेखासंहिता लागू झालेली असल्याने यातील तरतूदी लक्षात घेऊन विद्यापीठाचे सन 2015-16 या वर्षाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. या अंदाजपत्रकातील काही लेखाशिर्ष नव्याने तयार करण्यात आल्याने त्यातील तरतूदी कमी पडत असल्याचे लक्षात येत आहे. त्यादृष्टीने सोबत जोडलेल्या परिशिष्टानुसार लेखाशिर्षामध्ये वाढीव तरतूदी करण्याची बाब विचारार्थ.<br>**वि.स.ठराव** - सन 2015-16 आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकीय तरतूदींमध्ये वाढ करण्यास तसेच यापुढेही आवश्यक असेल तेथे अंदाजपत्रकीय तरतूदींमध्ये वाढ करण्याचे अधिकार मा.कुलगुरूंना देण्यात आले यास व्यवस्थापन मंडळाच्या मंजूरीस्तव शिफारशीसह सादर.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारशीनुसार सन 2015-16 आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकीय तरतूदींमध्ये वाढ करण्यास तसेच यापुढेही आवश्यक असेल तेथे अंदाजपत्रकीय तरतूदींमध्ये वाढ करण्याचे अधिकार मा.कुलगुरूंना देण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | 151.4.13<br>वि.स.बैठक<br>5.4.14 | Awareness Courses in Cyber Security या अभ्यासक्रमाच्या IQSS या संस्थेस त्यांचा हिस्सा अदा करण्याची बाब विचारार्थ..<br>(टिपणी: सहयोग व विशेष प्रकल्प केंद्रामार्फत Awareness Course in Cyber Security हा शिक्षणक्रम दि. 20.2.13 पासून राबविला जात होता. विद्वत परिषद आणि व्यवस्थापन मंडळाच्या ठरावाप्रमाणे सदरचा शिक्षणक्रम डिसेंबर 2014 पासून निरंतर शिक्षण विद्याशाखेमार्फत राबविला जात आहे. सदरच्या शिक्षणक्रमाचे शुल्क रचना आणि IQSS या संस्थेस त्यांचा वाटा प्रदान करण्याची पद्धत या बाबत दि. 5.6.13 च्या मा.कुलगुरूंनी मंजूर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे कार्यवाही केली जात होती. त्यानुसार शिक्षणक्रम शुल्क प्रति विद्यार्थी रु.1,800/- त्यामध्ये विद्यापीठाचा हिस्सा रु.540/- आणि IQSS चा हिस्सा रु.900/-, व अभ्यास केंद्र शुल्क रु.360/- असे आहे. अभ्यास केंद्राकडून रु.360/- परस्पर वसूल केले जाते. विद्यापीठाकडे रु.1,440/- डीडी पाठविला जातो. त्यानंतर IQSS चा हिस्सा विद्यापीठाकडून प्रदान केला जातो. त्यानुसार शिक्षणक्रम शुल्क प्रति विद्यार्थी रु.1800/- तसेच IQSS चा हिस्सा रु.900/- अदा करण्याची बाब विचारार्थ.<br>**वि.स.ठराव** - Awareness Courses in Cyber Security शिक्षणक्रम शुल्क निश्चितीस व IQSS चा हिस्सा प्रदान करण्यास मान्यता देण्यात आली त्यास व्यवस्थापन मंडळाच्या मंजूरीस्तव शिफाशीसह सादर. |

| | | |
|---|---|---|
| | | **व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारशीनुसार Awareness Courses in Cyber Security शिक्षणक्रम शुल्क रुपये 1800/- व IQSS चा हिस्सा रुपये 900/- प्रति विद्यार्थी अदा करण्यास मान्यता देण्यात आली** |
| | 151.4.14<br>वि.स.बैठक<br>5.4.15 | सन 2015-16 करिता विविध छपाई कामांसाठी आवश्यक कागद खरेदी खर्च रु.80,00,000/- विचारार्थ सादर.<br>(टिपणी: निर्मिती अधिकारी, ग्रंथनिर्मिती केंद्र यांनी सन 2015-16 या शैक्षणिक वर्षाकरिता विविध शिक्षणक्रमांच्या पाठ्यपुस्तकांच्या प्रथम तसेच पुनर्मुद्रणासाठी आणि विविध पुस्तकेतर छपाई कामांसाठी आवश्यक अशा 04 प्रकारच्या कागदांच्या खरेदीसाठी येणाऱ्या अंदाजे रु.80,00,000/- खर्चाचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर खर्चास व निविदा तयार करणे, जाहिरात देणे, इ. देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ.)<br>**वि.स.ठराव** - सन 2015-16 करिता विविध छपाई कामांसाठी आवश्यक कागद खरेदी खर्च रु.80,00,000/- यांस मान्यता देण्यात आली. त्यास व्यवस्थापन मंडळाच्या मंजूरीस्तव शिफारशीसह सादर.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारशीनुसार सन 2015-16 करिता विविध छपाई कामांसाठी आवश्यक कागद खरेदी खर्च रु.80,00,000/- यांस मान्यता देण्यात आली.** |
| | 151.4.15<br>वि.स.बैठक<br>5.4.18 | PG Diploma in e_Education in Digital Society (PG-DEEDS) या शिक्षणक्रमाचे शुल्क निश्चिती आणि या शुल्काची YCMOU व MKCL या मध्ये विभागणी करण्याची करण्याची बाब विचारार्थ.<br>(टिपणी: महाराष्ट्रातील विविध विद्यापीठे व शैक्षणिक संस्था यांनी एकत्रित येऊन त्यांची एक Consortium I-CONSENT (Indian Consortium for Eductional Transformation) ही 2005 मध्ये स्थापन केली. या Consortium चा यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ एक भाग आहे. I-CONSENT च्या प्रयत्नातून बी.एड् (e-Education) हा शिक्षणक्रम विकसित करण्यात आला. या विकसनासाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंग (COL), कॅनडा यांनी आर्थिक पाठबळ दिले या पाठबळातून Scenario - based - learning मधील ऑस्ट्रेलियातील तज्ज्ञ प्रा. सोम नायडू यांचे मार्गदर्शन लाभले. विकसित झालेला शिक्षणक्रम यशवंतराव चव्हाम महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक व एम.के.सी.एल., पुणे यांच्याद्वारा तंत्रवैज्ञानिक मदत घेऊन 2009 - 11 दरम्यान पथदर्शी तुकडी म्हणून राबविला गेला. यातील विद्यार्थ्यांनी त्यांच्या अनुभवावर व प्रयोगावर आधारित शोध निबंध आतंरराष्ट्रीय पातळ्यांवर सादर केले. याच दरम्यान एन.सी.टी.ई (National Council for Teacher Eduction), नवी दिल्ली यांची या शिक्षणक्रमाला Innovative Program म्हणून मान्यता मिळण्यासाठी विद्यापीठाकडून प्रयत्नदेखील करण्यात आले परंतु यामध्ये अनेक तांत्रिक अडचणी असल्याचे निष्पन्न झाले. दरम्यानच्या काळात COL च्या आर्थिक पाठबळातून व पथदर्शी तुकडीच्या अनुभवातून या शिक्षणक्रमाचे अध्ययन साहित्य अधिक चांगले करण्याचे प्रयत्न झाले. डिसेंबर 2014 मध्ये राष्ट्रीय पातळीवरील तज्ज्ञांना पाचारण करून सदर शिक्षणक्रमाबाबतचा संपूर्ण तपशील त्यांच्यासमोर मांडला गेला. हा शिक्षणक्रम NCTE च्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या नामाभिदानात न अडकला जाता. गेल्या 7 ते 8 वर्षे केलेली मेहनत समाजापर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टिकोनातून त्याचा कसा वापरता येईल या पर्यायावर चर्चा झाली या चर्चेतून तो PG Diploma in e_Education in Digital Society (PG-DEEDS) राबविले जाणे उचित ठरेल असे मत व्यक्त करण्यात आले. त्यानुसार PG-DEEDS हा शिक्षणक्रम नव्यानेच शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत सन 2015-16 च्या तुकडीपासून सुरु करण्यात येत आहे. एकविसाव्या शतकातील शिक्षक तयार करण्याची नाविन्यपूर्ण योजना आहे. मुक्त विद्यापीठातील विविध शिक्षणक्रमांच्या समंत्रकांना प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षक शिक्षक तयार करण्यासाठी हा शिक्षणक्रम उपयुक्त आहे. त्यासाठी YCMOU व MKCL Share 30% - 70% अशी असेल. या शिक्षणक्रमासाठी एकूण 500 समंत्रकांना दरवर्षी विनाशुल्क प्रवेश देण्यात येईल. त्यातील 250 समंत्रक मुक्त विद्यापीठ व 250 समंत्रक एम.के.सी.एल. कडून भरण्यात येतील. मुक्त विद्यापीठामार्फत प्रवेश घेतलेले समंत्रक अभ्यासकेंद्रांवर समंत्रक म्हणून कार्यरत असतील. या समंत्रकांचा वयोगट वर्ष 45 च्या दरम्यान असेल. या समंत्रकांकडून त्यांच्या व इतर अभ्यास केंद्रांवरील समंत्रकांना प्रशिक्षण देण्यास तयार आहे असे हमीपत्र घेण्यात येईल. तिसऱ्या वर्षी शुन्य किंमत या पद्धतीने विद्यार्थ्यांकडून रु.500/- घेवून हा शिक्षणक्रम राबविण्यात येईल. मुक्त विद्यापीठाला PG Diploma in E-Education in Digital Society या शिक्षणक्रमाच्या दोन वर्षासाठी रु.42,00,000/- (प्रति वर्ष रु.21,00,000/-) खर्च |

| | | |
|---|---|---|
| | | करावा लागेल. या खर्चास व शिक्षणक्रम योजना राबविण्याबाबतची बाब विचारार्थ.)<br>**वि.स.ठराव** - PG Diploma in E-Education in Digital Society (PG-DEEDS) या शिक्षणक्रमाचे शुल्क निश्चिती आणि रचना याबाबत खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आली. त्यास व्यवस्थापन मंडळाच्या शिफारशीसह सादर. (१) YCMOU व MKCL या मध्ये विभागणीस तसेच दोन वर्षासाठी रु.42,00,000/- (प्रति वर्ष रु.21,00,000/-) कराव्या लागणाऱ्या खर्चास तसेच दरवर्षी 250+250 असे अनुक्रमे YCMOU व MKCL चे एकूण 500 समंत्रकांना प्रशिक्षण देण्यास मंजूर देण्यात आली. (२) तिसऱ्या वर्षी शुन्य किंमत या पध्दतीने विद्यार्थ्यांकडून रुपये 500/- घेऊन हा शिक्षणक्रम राबविण्यास व शुल्क आकारण्यास मंजूरी देण्यात आली. (३) शुल्क रचना मान्य करुन मंजूरी देण्यात आली.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारशीनुसार वित्त समितीने केलेल्या ठरावास मान्यता देण्यात आली.** |
| | 151.4.16<br>वि.स.बैठक<br>5.4.22 | दि. 12.3.2015 आणि 20.5.2015 रोजी झालेल्या खरेदी समितीच्या बैठकीचे इतिवृत्त माहितीस्तव सादर.<br>**वि.स.ठराव** - खरेदी समिती सभा दि. 12.3.2015 आणि 20.5.2015 रोजी झालेल्या खरेदी समिती बैठकांच्या इतिवृत्तांची नोंद घेण्यात येऊन त्यास व्यवस्थापन मंडळाच्या मंजूरीस्तव शिफारशीसह सादर..<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीनेकेलेल्या शिफरशीनुसार खरेदी समिती सभा दि. 12.3.2015 आणि 20.5.2015 रोजी झालेल्या खरेदी समिती बैठकांच्या इतिवृत्तांची नोंद घेण्यात आली.** |
| | 151.4.17<br>वि.स.बैठक<br>5.4.24 | विद्यापीठामध्ये आपत्कालीन व्यवस्थापन निधी निर्माण करण्याबाबतची बाब विचारार्थ.<br>(टिपणी : शैक्षणिक वर्ष 2005 ते 2014 या कालावधीत सर्व शिक्षणक्रमांची एकूण नोंदणी संख्या 38,85,644 एवढी आहे. त्यानुसार प्रती विद्यार्थी रु.10 या दराने एकूण जमा झालेला रु.3,88,56,440/- एवढा निधी जमा झालेला आहे. हा निधी शासनाच्या निर्देशाप्रमाणे मुदत ठेवीत जमा करून त्यावर दरवर्षी मिळणाऱ्या व्याजामधून आपत्कालिन व्यवस्थापन कक्ष स्थापन करून त्याद्वारे दरवर्षी आपत्कालिन व्यवस्थेसंबंधी शिक्षक तसेच विद्यार्थी यांच्यासाठी कार्यशाळा आयोजित करावयाच्या आहेत. त्यानुसार हा निधी आपत्कालिन व्यवस्थापन निधी म्हणून स्वतंत्रपणे अर्थसंकल्पात लेखाशिर्ष तयार करून गुंतवणूक करण्यास मान्यता मिळावी म्हणून विचारार्थ.<br>**वि.स.ठराव** - एकूण जमा झालेला रु.3,88,56,440/- निधी निर्माण करुन शासनाच्या निर्देशाप्रमाणे मुदत ठेवीत जमा करून, त्यावर दरवर्षी मिळणाऱ्या व्याजामधून, आपत्कालीन व्यवस्थापनावर खर्च करण्यास मान्यता देण्यात आली. त्यास व्यवस्थापन मंडळाच्यामंजूरीस्तव शिफारशीसह सादर.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीच्या शिफारशीनुसार एकूण जमा झालेला रु.3,88,56,440/- निधी निर्माण करुन शासनाच्या निर्देशाप्रमाणे मुदत ठेवीत जमा करून, त्यावर दरवर्षी मिळणाऱ्या व्याजामधून, आपत्कालीन व्यवस्थापनावर खर्च करण्यास मान्यता देण्यात आली** |
| | 151.4.18<br>वि.स.बैठक<br>5.4.25 | M/s. IIST Infotech Pvt. Ltd., Nashik यांचेमार्फत विद्यापीठाचा ॲप विकसित करणेबाबत वित्त समितीने केलेली शिफारस विचारार्थ.<br>(टिपणी: M/s. IIST Infotech Pvt. Ltd., Nashik यांनी विद्यापीठाचा OMYGOD App. विकसित करणेबाबतचा प्रस्ताव सादर केलेला असून प्रस्ताव विचारार्थ सादर.)<br>**वि.स.ठराव** - M/s. IIST Infotech Pvt. Ltd., Nashik यांचे विद्यापीठाचा ॲप विकसित करणेबाबतच्या प्रस्तावास प्रथम तीन वर्षाच्या कालावधीपर्यंत मान्यता देण्यात आली. त्यास व्यवस्थापन मंडळाच्या मंजूरीस्तव शिफारशीसह सादर.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारशीनुसार M/s. IIST Infotech Pvt. Ltd., Nashik यांचे विद्यापीठाचा ॲप विकसित करणेबाबतच्या प्रस्तावास प्रथम तीन वर्षाच्या कालावधीपर्यंत मान्यता देण्यात आली** |
| | 151.4.19<br>वि.स.बैठक<br>5.5.2 | मा.यशवंतराव चव्हाण व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनानिमित्त आयोजित करावयाच्या चर्चासत्रासंदर्भात सन 2015-16 च्या अंदाजपत्रकामध्ये नवीन शिर्षक उघडून त्यामध्ये आर्थिक तरतूद करण्याबाबत वित्त समितीने केलेली शिफारस विचारार्थ.<br>(टिपणी: मा.यशवंतराव चव्हाण व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनानिमित्त तीन दिवसांचे राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करावयाचे आहे. त्यासाठी प्रत्येकी रु.3,53,000/- खर्च अपेक्षित आहे. यासाठी नव्याने तरतूद करावी लागणार असल्याने सन 2015-16 च्या अंदाजपत्रकात रु.7,50,000/- तरतूद करण्यास मान्यता मिळावी यासाठी प्रस्ताव सादर. |

| | | |
|---|---|---|
| | | **वि.स.ठराव** - मा.यशवंतराव चव्हाण व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनानिमित्त आयोजित करावयाच्या चर्चासत्रासाठी सन 2015-16 च्या अंदाजपत्रकात A.1.P.25 या लेखाशिर्षात मंजूर असलेल्या तरतूदीत रु.7,50,000/- अंदाजपत्रकीय तरतूद वाढ करण्यास मान्यता देण्यात आली. त्यास व्यवस्थापन मंडळाच्या शिफारशीसह सादर.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारशीनुसार मा.यशवंतराव चव्हाण व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनानिमित्त आयोजित करावयाच्या चर्चासत्रासाठी सन 2015-16 च्या अंदाजपत्रकात A.1.P.25 या लेखाशिर्षात मंजूर असलेल्या तरतूदीत रु.7,50,000/- अंदाजपत्रकीय तरतूद वाढ करण्यास मान्यता देण्यात आली** |
| | 151.4.20<br>वि.स.बैठक<br>5.5.3 | मे.यश सिक्युरिटी अँण्ड लेबर सर्विसेस या फर्मचे प्रलंबित देयक अदा करणेबाबत वित्त समितीने केलेली शिफारस विचारार्थ..<br>(टिपणी : मे.यश सिक्युरिटी अँण्ड लेबर सर्विसेस यांचे सन 2004 ते 2009 या कालावधीतील देयक प्रलंबित असून ते सातत्याने पाठपुरावा करीत आहेत. त्यांनी सादर केलेले देयक विचारार्थ सादर..<br>**वि.स.ठराव** - विद्यापीठाने मे.यश सिक्युरिटी अँन्ड लेबर सर्व्हिसेस यांच्या पूर्वीच्या रकमेचे प्रलंबित देयक त्यावेळच्या करासंह देण्यास मान्यता देण्यात आली. त्यास व्यवस्थापन मंडळाच्या मंजूरीस्तव शिफारशीसह सादर.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारशीनुसार विद्यापीठाने मे.यश सिक्युरिटी अँन्ड लेबर सर्व्हिसेस यांच्या पूर्वीच्या रकमेचे रुपये 3,27,809/- प्रलंबित देयक विद्यापीठाने त्यांच्याशी केलेल्या करारातील अटी व शर्ती पाहून तसेच यापूर्वी देयकाची रक्कम दिलेली आहे किंवा नाही याची तपासणी करुन त्यानंतर संबंधित कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यास मान्यता देण्यात आली** |
| | 151.4.21<br>वि.प.बैठक<br>52.4.14<br>कुलसचिव<br>कार्यालय | दि. 27 ते 29 मार्च 2015 रोजी स्थानिक वर्तमानपत्रात विद्यापीठातील शिक्षकांनी विद्यापीठातील पीएच.डी करुन 6 व्या वेतन आयोगानुसार फायदे घेतले त्यासंदर्भात नेमण्यात आलेल्या पीएच.डी चौकशी समिती अहवाल विचारार्थ.<br>**वि.प.ठराव:** दि. 27 ते 29 मार्च 2015 रोजी स्थानिक वर्तमानपत्रात विद्यापीठातील शिक्षकांनी विद्यापीठातील पीएच.डी करुन 6 व्या वेतन आयोगानुसार फायदे घेतले त्यासंदर्भात नेमण्यात आलेल्या पीएच.डी चौकशी समिती अहवाल मान्य करण्यात आला. व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ.<br>**व्य.मं.ठराव: विद्वत परिषदेने केलेल्या ठरावाची नोंद घेण्यात आली.** |
| | 151.4.22<br>सभा व दप्तर<br>कक्ष | नियोजन मंडळावर विद्यापीठ परिनियम क्र. 3 मधील (1/1992) 3 iv नुसार एका सदस्यांची नियुक्ती करण्याची बाब विचारार्थ.<br>(टिपणी - विद्यापीठ परिनियम क्रमांक 3 (1/1992) मधील (iv) Three member nominated by Board of Management out of which two shall be distingished persons from the field of (i) Education (ii) Research (iii) Technical and Vocational Education (iv) Agriculture (v) Industries (vi) Management (vii) Commerce (viii) Science and Technology (ix) Distance Education and one shall be amongest the Board of Management अशी तरतूद आहे. त्यानुसार नियोजन मंडळावर श्री रितुराज सार व अंबादास मोहिते यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यापैकी ((i) ते (ix) नुसार श्री. अंबादास मोहिते यांची मुदत दिनांक 10/9/2015 रोजी संपुष्टात आली आहे. विद्यापीठाच्या नियोजन मंडळावर एका सदस्याचे नामनिर्देशन करुन मिळण्यासाठीची बाब विचारार्थ.<br>**व्य.मं.ठराव: नियोजन मंडळावर विद्यापीठ परिनियम क्र. 3 मधील (1/1992) 3 iv नुसार एका सदस्यांची नियुक्ती करण्याबाबत मा. कुलगुरु यांना अधिकार प्रदान करण्यात मान्यता देण्यात आली.** |
| | 151.4.23<br>सभा व दप्तर<br>कक्ष | विद्वत परिषदेवर परिनियम क्र. 5 मधील 3 मधील **viii** नुसार एका सदस्यांची नियुक्ती करण्याची बाब विचारार्थ.<br>(टिपणी – विद्यापीठ परिनियम क्रमांक 5 (3 of 1992) 3 मधील (viii) अन्वये Not less than 10 persons Industries, trade and commerce, academic and professional organisations, communicaion field, agriculture and agro-industries, services etc. विविध क्षेत्रातील विद्यापीठाच्या सेवेत नाही. अशा सदस्यांची नियुक्ती व्यवस्थापन मंडळाकडून करण्यात येते. त्यापैकी एक सदस्य डॉ. संजय त्र्यंबक खडक्कर यांची मुदत दिनांक 4 ऑक्टोबर 2015 रोजी संपते आहे.<br>विद्यापीठाच्या विद्वत परिषदेवर एका सदस्यांचे नामनिर्देशन करुन मिळण्यासाठीची बाब विचारार्थ. |

| | | |
|---|---|---|
| | | **व्य.मं.ठराव: विद्वत परिषदेवर परिनियम क्र. 5 मधील 3 मधील viii नुसार एका सदस्यांची नियुक्ती करण्याबाबत मा. कुलगुरु यांना अधिकार प्रदान करण्यात मान्यता देण्यात आली.** |
| | 151.4.24<br>आरक्षण कक्ष | विद्यापीठातील शिक्षक व प्रशासकीय रिक्त पदांची जाहिरात देण्याची बाब विचारार्थ.<br>(टिपणी : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात दि. 24.06.2015 रोजी विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीने भेट दिली या भेटीदरम्यान त्यांना दिलेल्या आश्वासनानुसार विमुक्त जाती व भटक्या जमातीची रिक्त पदे व इतर काही आवश्यक पदे तातडीने भरण्यासाठी विद्यापीठास सुचविले आहे. शिक्षक व प्रशासकीय रिक्त पदांचा तक्ता तसेच जाहिरातीचा मसुदा सोबत जोडला आहे.<br>**व्य.मं.ठराव: विद्यापीठातील शिक्षक व प्रशासकीय रिक्त पदांची जाहिरात देण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | 151.4.25<br>आरक्षण कक्ष | डॉ.शरणकुमार लिंबाळे, प्राध्यापक पदोन्नती यांच्या गोपनीय मूल्यांकनाची प्रतवारी ठरविण्याबाबतची बाब विचारार्थ.<br>(टिपणी : मानव्यविद्या शाखेचे प्रभारी संचालक डॉ. शरणकुमार लिंबाळे प्राध्यापक पदोन्नती हे दि. 01.06.2016 रोजी वयाची 60 वर्षे पूर्ण होत असल्यामुळे नियत वयोमानानुसार दि. 31 मे, 2016 रोजी सेवानिवृत्त होत आहेत महाराष्ट्र शासनाच्या अध्यापकांच्या सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्याबाबतच्या दि. 05 मार्च, 2011 च्या शासन निर्णयानुसार तसेच वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार सेवानिवृत्तीच्या नियत वयोमानात वाढ करून मिळण्यासाठी डॉ. लिंबाळे यांनी विनंती अर्ज केला आहे. सोबतच्या टिपणीत नमूद केल्याप्रमाणे शासन निर्णयात असलेल्या तरतुदीनुसार अध्यापकांचे मागील पाच वर्षातील वार्षिक गोपनीय अहवाल विचारात घेऊन सर्वसाधारण मूल्यमापनाची प्रतवारी किमान तीन वर्ष निश्चित चांगला असणे आवश्यक आहे. त्यानुसार डॉ. लिंबाळे यांच्या मागील पाच वर्षांपैकी सन 2010-11, 2011-12 व 2012-13 या तीन वर्षांचे गोपनीय अहवाल कै. कृष्णकुमार यांच्या कालावधीतील असून त्यांच्या प्रकृती अस्वास्थामुळे व त्यानंतर त्यांचे निधन झाल्याने गोपनीय अहवालांची पूर्तता झाली नव्हती. मात्र दि. 23.07.2014 रोजीच्या व्यवस्थापन मंडळाचा ठराव क्र. ब-100/14/59 अन्वये प्रभारी कुलगुरू डॉ. अरूण जामकर यांना गोपनीय अहवालांचे पुनर्विलोकन करण्याचे अधिकार देण्यात आले होते. त्यानूसार प्रभारी कुलगुरू डॉ. अरूण जामकर यांनी गोपनीय अहवालांवर स्वाक्षरी करून दिली आहे परंतु प्रतवारी केलेली नाही. डॉ. लिंबाळे यांच्या वयोमर्यादेत वाढ करून देण्यासाठी त्यांच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी कशाप्रकारे ठरवावी ही बाब विचारार्थ सादर.<br>**व्य.मं.ठराव: डॉ.शरणकुमार लिंबाळे, प्राध्यापक पदोन्नती यांच्या गोपनीय मूल्यांकनाची प्रतवारी ठरविण्याबाबत मा. कुलगुरु यांना अधिकार प्रदान करण्यात मान्यता देण्यात आली.** |
| | 151.4.26<br>आरक्षण कक्ष | मूल्यमापन विभाग व मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेतील प्रत्येकी तीन प्रमाणे सहा कनिष्ठ सल्लागारांची कराराची मुदत संपत असल्यामुळे त्यांना पुढील मुदतवाढ देण्याची बाब विचारार्थ.<br>(टिप्पणी : विद्यापीठातील मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेतील श्री. रोहित कसबे, श्री. अमोल देवरे. श्री. प्रशांत देवरे, श्री. मोहम्मद असिफ अब्दुल रहिम व मूल्यमापन विभागातील श्री. नारायण जाधव, श्री. प्रशांत गायकवाड व श्री. योगेश गायकवाड यांच्या अनुक्रमे नोव्हेंबर 2015 व फेब्रुवारी 2016 मध्ये मुदत संपुष्टात येत आहे. विद्यापीठ कायद्यातील **Second Schedule STATUTES OF THE UNIVERSITY** मुद्दा क्र. 2 **Powers and Function of the Vice-Chancellor** मधील 9(C) नूसार **to make short term appointment for a period not exceeding six months at a time, but which may further be extended for a period not exceeding one year in the aggregate, of such persons as may be considered necessary for the functioning of the university** व **STATUTE No. 11 (2 of 1993)** मधील मुद्दा क्र. 5.4 **The period of contract shall, at a time be of not less than six months and not more than to years, extendible upto one more year with the prior approval of the Board of Management** या प्रमाणे दोन वर्षाचा कालावधी पूर्ण होत असल्यामुळे पुन्हा एक वर्षाची मुदतवाढ द्यावयाची असल्यास व्यवस्थापन मंडळाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे.<br>सबब एक वर्षे मुदतवाढ देण्यासाठी विचारार्थ. मान्यता घेणे त्यांच्या सेवेचा करारावरील कालावधी दोन वर्षाचा पूर्ण होत असल्यामुळे विद्यापीठ परिनियम क्र. 11 मधील 5.4 च्या तरतुदीनुसार पुढील 1 वर्षाची मुदतवाढ मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेने देण्याची तरतुद असल्यामुळे वरील सहा कनिष्ठ सल्लागारांना पुढील 1 वर्षासाठी मुदतवाढ देणेबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ. |

| | | |
|---|---|---|
| | | **व्य.मं.ठराव: मूल्यमापन विभाग व मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेतील प्रत्येकी तीन प्रमाणे सहा कनिष्ठ सल्लागारांची कराराची मुदत संपत असल्यामुळे त्यांना पुढील एक वर्षासाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | 151.4.27<br>आरक्षण कक्ष | विद्यापीठ स्तरावर आरक्षण कक्षासाठी स्थायी समिती गठीत करण्याची बाब विचारार्थ.<br>टिप्पणी : विद्यापीठाच्या आस्थापनेवर विविध शिक्षक व शिक्षकेत्तर सहवर्गाची पदे मंजुर असून सदरची रिक्त पदे भरतांना अथवा पदोन्नती देतांना शासन निर्णयानुसार विविध सहवर्गाचे आरक्षणाचे बिंदू निश्चित करून त्यानूसार भरती प्रक्रिया राबवावी लागते. सद्या विद्यापीठ स्तरावर आरक्षणाचे बिंदू नामावलीचे काम मावक, नाशिक व मंत्रालय, मुंबई यांच्यामार्फत करण्यात येते तथापी जाहिरात देतांना याबाबत योग्यरित्या प्रक्रिया राबविण्याच्या दृष्टीने विद्यापीठ स्तरावर स्थायी समिती नियुक्त करावी असे प्रस्तावित आहे. या समितीमध्ये खालील सदस्यांचा समावेश असावा. 1) मा. कुलगुरू — अध्यक्ष, 2) मागासवर्गीय शिक्षक प्रतिनीधी — मा. कुलगुरू नियुक्त सदस्य, 3) मागासवर्गीय शिक्षकेत्तर प्रतिनीधी - मा. कुलगुरू नियुक्त सदस्य, 4) कुलसचिव — सदस्य, 5) आरक्षण कक्ष — उपकुलसचिव, सदस्य सचिव.<br>**व्य.मं.ठराव: विद्यापीठ स्तरावर आरक्षण कक्षासाठी टिपणीत नमूद केलेली स्थायी समिती गठीत करण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | 151.4.28<br>आरक्षण कक्ष | पदोन्नतीसाठी पूर्व अट म्हणून निम्न संवर्गात/सेवेत/श्रेणीत किमान सेवेच्या अनुभवाची अट विहित करणेबाबतची बाब विचारार्थ.<br>(टिपणी — विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाचा ठराव क्र-ऐ..100/93/ अन्वये विद्यापीठातील 27 अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या भरती व पदोन्नतीचा मसुदा परिनियम मान्य करण्यात आला आहे. आतापर्यंत विद्यापीठातील प्रशासकीय व तांत्रिक पदांच्या पदोन्नती व सरळसेवा भरती त्यानुसार करण्यात आल्या आहेत. सदर मसुदा परिनियामामधे पदोन्नती देण्यासाठी 5 वर्षे सलग सेवा ही पूर्वअट दर्शविलेली आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या प्रमाण संहिता नियम 1984 मधील सरळसेवा व पदोन्नतीचा नियम क्र. 3 (I) (II) मधे वर्ग 1 आणि वर्ग 2 साठी किमान 5 वर्षांच्या अनुभवाची अट दर्शविली आहे. (सहपत्र अ)<br>महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या पुरक पत्र क्र. संकिर्ण 2013/(81/2013)/ विशि-1 दिनांक 29.1.2014 अन्वये शिक्षकेतर पदांसाठी नवीन सेवा प्रवेश नियम अंमलात येईपर्यंत प्रमाणसंहिता (शिक्षकेतर पदांच्या अटी व सेवा शर्ती) नियम, 1984 चा अवलंब करण्यास मान्यता दिली आहे. प्रमाण संहितेत उपरोक्त सरळसेवा व पदोन्नतीचा नियम क्र. 3 (I) (II) मधे वर्ग 1 आणि वर्ग 2 साठी किमान 5 वर्षांच्या अनुभवाची अट दर्शविली आहे. (सहपत्र ब)<br>महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र.एसआरव्ही-2014/प्र.क्र.354/14/क.12 दिनांक 5.10.2015 अन्वये गट क (वर्ग 3) पासून गट अ (वर्ग 1) मधील सर्व टप्प्यापर्यंतच्या आंतरश्रेणी पदोन्नतीसह प्रत्येक टप्प्यावर पदोन्नती करताना निकटतम निम्न पदावर नियमित तीन वर्षाच्या किमान सेवेच्या पूर्व अटीचा आदेश निर्गमित केला आहे. (सहपत्र क)<br>उपरोक्त बाबी लक्षात घेता, दिनांक 5.10.2015 चा शासन निर्णयातील तरतुदीसाठी पदोन्नती करताना निकटतम निम्न पदावर नियमित तीन वर्षाच्या किमान सेवेच्या पूर्व अटीची बाब लागू करण्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन विचारार्थ. .<br>**व्य.मं.ठराव: पदोन्नतीसाठी पूर्व अट म्हणून निम्न संवर्गात/सेवेत/श्रेणीत किमान सेवेच्या अनुभवाची अट विहित करण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | 151.4.29<br>विद्यार्थी कल्याण व बहि:शाल केंद्र. | विद्यार्थी कल्याण मंडळ किंवा विद्यार्थी कल्याण तज्ञ सल्लागार समिती स्थापन करण्याबाबतची बाब विचारार्थ.<br>(टिपणी - विद्यापीठात विद्यार्थी कल्याण व विद्यार्थी बहि:शाल शिक्षणकेंद्र असून तेथील कामाची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत आहे. विविध संस्था व क्षेत्रांशी या केंद्राचा संबंध येत असल्यामुळे वेळोवेळी मार्गदर्शन घ्यावे लागते. यासाठी खालील कार्यकारीणी समिती असावी. अध्यक्ष - मा.कुलगुरु, सदस्य - कुलसचिव, वित्त अधिकारी, विद्यापीठातील आपत्ती व्यवस्थापन कक्ष प्रमुख, विद्यापीठातील एनएसएस समन्वयक, श्री.श्याम पाडेकर - कलाक्षेत्रातील नामवंत व्यक्ती, श्री.डी.के.गायकवाड — संचालक. विद्यार्थी कल्याण, शिवाजी विद्यापीठ. कोल्हापूर, श्री.निलेश साबे- संचालक, विद्यार्थी कल्याण, मुंबई विद्यापीठ, डॉ. दिपक माने, - संचालक, विद्यार्थी कल्याण, सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ, पुणे व डॉ. प्रमोद पाब्रेकर, उपप्राचार्य, व्ही.जी.वझे महाविद्यालय, मुंबई, सदस्य सचिव - प्रमुख, विद्यार्थी कल्याण व बहि:शाल शिक्षणकेंद्र. |

| | | |
|---|---|---|
| | | **व्य.मं.ठराव: विद्यार्थी कल्याण मंडळ किंवा विद्यार्थी कल्याण तज्ञ सल्लागार समिती स्थापन करण्याबाबत टिपणीत नमूद केलेली स्थायी समिती गठीत करण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | 151.4.30<br>आरक्षण कक्ष | बी.बी.ए. (बिझिनेस प्रोसेस मॅनेजमेंट) शिक्षणक्रमाच्या प्रशिक्षणार्थींना रजा देण्याबाबतची बाब विचारार्थ.<br>(टिपणी- शैक्षणिक वर्ष 2015-16 पासून बी.बी.ए. (बिझिनेस प्रोसेस मॅनेजमेंट) या रोल बेस्ड शिक्षणक्रमाचे विद्यापीठात स्टडी सेंटर अँट वर्कप्लेस सुरू करण्यात आले आहे. जून 2015 मधे या शिक्षणक्रमास 34 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे. या प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांचा प्रशिक्षण कालावधी तीन वर्षांचा असून या विद्यार्थ्यांना विद्यापीठ मुख्यालय व विभागीय केंद्रांवर वर्क लॅबची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर उपक्रम हा अँप्रेनटिसशीप संकल्पनेतील नाही. त्यामुळे त्यांच्या प्रशिक्षण कालावधीत विद्यार्थ्यांना किती सुट्या द्याव्यात याबाबतची तरतूद सध्या अस्तित्वात नाही. मात्र संगणक विद्याशाखेने सदर विद्यार्थ्यांकडून हमीपत्र भरून घेतले आहे. त्यात प्रशिक्षणार्थींना प्रत्येक शैक्षणिक वर्षात पुढील रजा दिल्या आहेत.<br>1. किरकोळ रजा – 8 दिवस<br>2. वैद्यकिय रजा – 15 दिवस<br>3. असाधारण रजा – 10 दिवस<br>प्रशिक्षणार्थींना किरकोळ रजा व वैद्यकिय रजेच्या कालावधीत विद्यावेतन देय राहिल. मात्र असाधारण रजा कालावधीचे विद्यावेतन देय राहणार नाही. प्रशिक्षणार्थींना विद्यावेतन देण्यासाठी संगणकशास्त्र विद्याशाखेने प्रस्तावित केलेल्या ठरावास दिनांक 27 मार्च 2015 रोजीच्या व्यवस्थापन मंडळाने 149.2.5.13 अन्वये मान्यता दिली आहे. सदरहू शिक्षणक्रमाची संपूर्ण जबाबदारी संगणकशास्त्र विद्याशाखेची असल्याने प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांचे दरमहा विद्यावेतन संगणकशास्त्र विद्याशाखेमार्फत अदा करण्यास आणि त्यांना उपरोक्त रजा देण्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ.<br>**व्य.मं.ठराव: बी.बी.ए. (बिझिनेस प्रोसेस मॅनेजमेंट) शिक्षणक्रमाच्या प्रशिक्षणार्थींना टिपणीत नमूद केल्याप्रमाणे रजा देण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | 151.4.31<br>आरक्षण कक्ष | विद्यापीठात पीएच.डी. शिक्षणक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना रजा देण्याबाबतची बाब विचारार्थ.<br>(टिपणी - शैक्षणिक वर्ष 2015-16 मधे रिसर्च फेलोशिपतंर्गत विविध विद्याशाखेत पीएच.डी. करण्यासाठी एकूण 42 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. सदर विद्यार्थ्यांना संशोधन कालावधीत पुढीलप्रमाणे रजा देण्याचे प्रस्तावित आहे.<br>1. किरकोळ रजा – 8 दिवस 2. वैद्यकिय रजा – 15 दिवस 3. असाधारण रजा – 10 दिवस<br>संशोधनार्थी विद्यार्थ्यांना किरकोळ रजा व वैद्यकिय रजेच्या कालावधीत विद्यावेतन देय राहिल. मात्र असाधारण रजा कालावधीचे विद्यावेतन देय राहणार नाही. या विद्यार्थ्यांच्या उपस्थितीच्या सर्व नोंदी संबंधित विद्याशाखेने ठेवावे. संशोधनार्थी विद्यार्थ्यांचे दरमहा विद्यावेतन विद्याशाखांमार्फत अदा करण्यास आणि त्यांना उपरोक्त रजा देण्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ.<br>**व्य.मं.ठराव: विद्यापीठात पीएच.डी. शिक्षणक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना टिपणीत नमुद केल्याप्रमाणे रजा देण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | 151.4.32<br>आरक्षण कक्ष | डॉ.माधवी विवेक धारणकर, सहायक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांना ग्रहणाधिकार मिळणेबाबत...<br>(टिपणी – विद्यापीठातील शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या सहायक प्राध्यपिका डॉ.माधवी विवेक धारणकर यांची एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाच्या पत्र क्र.-ESTB-1/File 54/2015-16/1844 दिनांक 14.10.2015 अन्वये सहयोगी प्राध्यापक पदावर निवड झाली आहे. डॉ.माधवी विवेक धारणकर यांनी एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठात रूजु होण्यासाठी दोन वर्षाच्या कालावधीसाठी ग्रहणाधिकार मिळणेसाठी विनंती अर्ज केला आहे. दिनांक 8.11.1997 रोजीच्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीचा ठराव क्र. ए-100/97/91 नुसार ग्रहणाधिकाराचे नियम तयार करण्यासाठी समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीने तयार केलेले नियम दिनांक 27.12.199 रोजीच्या व्यवस्थापन मंडळाने काही दुरूस्त्यांसह मान्य केले आहेत. सोबत ठरावाची प्रत व समितीने तयार केलेल्या नियमांची प्रत अवलोकनार्थ जोडली आहे. सदर नियमांनुसार डॉ.माधवी धारणकर यांना एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठात सहयोगी प्राध्यापक या पदावर रूजु होण्यासाठी दोन वर्षाचा ग्रहणाधिकार मंजुर करण्याबाबतचा विषय व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ. |

**व्य.मं.ठराव: डॉ.माधवी विवेक धारणकर, सहायक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांना विद्यापीठ नियमानुसार दोन वर्षासाठी ग्रहणाधिकार देण्यास मान्यता देण्यात आली.**

150.4.33 आरक्षण कक्ष

श्री. अंकुश चिंचले, करारावरील प्रशासकीय अधिकारी यांना विशेष बाब म्हणून पुनर्नियुक्ती देण्याबाबत विचारार्थ.

(टिपणी : विद्यापीठाच्या वित्त विभागात श्री. अंकुश चिंचले हे करारावर प्रशासकीय पदावर कार्यरत आहेत. त्यांच्या सेवेचा तपशिल पुढीलप्रमाणे

| कर्मचाऱ्याचे नाव | पद विभाग | सेवेची मुदत | एकत्रित वेतन | कालावधी |
|---|---|---|---|---|
| श्री. चिंचले अंकुश | सहायक प्रशासकीय | दि. 24.09.07 ते दि. 23.03.08 | 6,000/- | 6 महिने |
| 10.09.1952 | अधिकारी | दि. 29.03.08 ते दि. 26.09.08 | 6,000/- | 6 महिने |
| 63 वर | परीक्षा विभाग | दि. 01.10.08 ते दि. 31.03.09 | 6,000/- | 6 महिने |
| | | दि. 07.04.09 ते दि 31.12.09 | 6,000/- | 8 महिने |
| | | दि. 16.01.10 ते दि. 30.06.10 | 10,000/- | 6 महिने |
| | प्रशासकीय | दि. 09.04.14 ते दि. 08.10.14 | 10,000/- | 6 महिने |
| | अधिकारी | दि. 27.10.14 ते दि. 26.04.14 | 10,000/- | 6 महिने |
| | वित्त अधिकारी | दि. 08.05.15 ते दि. 04.11. 15 | 15,000/- | 6 महिने |

श्री. अंकुश चिंचले यांची कराराची मुदत दि. 04.11.2015 रोजी संपुष्टात येत असून त्यांची विद्यापीठात करारावरील सेवा 4 वर्ष 2 महिने इतकी झालेली असल्यामुळे त्यांना विद्यापीठ परिनियम 11 (2 of 1993) च्या 5.4 मधील तरतुदीनुसार मुदतवाढ देता येत नाही. यापूर्वी मा. वित्त अधिकाऱ्यांच्या शिफारशीनुसार मा. कुलगुरूंनी विशेष बाब म्हणून श्री. अंकुश चिंचले यांना व्यवस्थापन मंडळाच्या वतीने 6 महिने मुदतवाढ दिली होती. श्री. अंकुश चिंचले यांना पुन्हा विशेष बाब म्हणून पुनर्नियुक्ती देण्याबाबतची बाब व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ

**व्य.मं.ठराव: श्री. अंकुश चिंचले, करारावरील प्रशासकीय अधिकारी यांना विशेष बाब म्हणून सहा महिन्यासाठी नियुक्ती देण्यास मान्यता देण्यात आली. यानंतर पुढील नियुक्ती देण्यात येऊ नये.**

151.5.0 **अध्यक्षांच्या परवानगीने येणारे विषय**

151.5.1 **विभागीय संचालकांच्या राजीनाम्याबाबत**

(टिपणी – 29 नोव्हेंबर 2014 च्या व्यवस्थापन मंडळाच्या व्यवस्थापन मंडळाच्याविषय क्रमांक 146.4.36 अन्वये नाशिक , मुंबई, पुणे, कल्याण, नागपूर, अमरावती, औरंगाबाद, नांदेड व सोलापूर या ठिकाणी एका वर्षासाठी विभागीय संचालक पदावर बाय इनव्हिटेशन व्यक्तींची नेमणूक करण्यासंदर्भात शोध समिती द्वारे निवड प्रक्रिया पार पाडण्याबाबतच्या ठरावाबाबतच्या अनुषंगाने उपरोक्त सर्व विभागीय केंद्रावर विभागीय संचालक पदासाठी अर्ज मागविण्यात आले होते. व शोध समितीच्या शिफारसीनुसार पात्र व्यक्तींची निवड करण्यात आली होती. प्राध्यापक डॉ. गोविंद माणिकराव कळमसे यांची नांदेड विभागीय संचालक पदावर कार्यालयीन आदेस क्रमांक के/005/आस्था/2014/1183 दिनांक 24/12/2014 नुसार नियुक्ती करण्यात आली होती. सदर कार्यालयीन आदेशानुसार दिनांक 30/12/2014 रोजी डॉ. गोविंद माणिकराव कळमसे हे नांदंड विभागीय केंद्रावर विभागीय संचालक या पदावर रुजू झाले होते. दिनांक 14/10/2015 रोजी डॉ. कळमसे यांनी पत्राद्वारे वैयक्तीक अडचणीमुळे राजीनामा सादर केला असून मा. कुलगुरु यांनी सदर राजीनामा स्वीकारला आहे. तसेच कार्यालयीन आदेश क्रमांक के/005/आस्था/2014,/1185 दिनांक 24/12/2014 नुसार डॉ. समद हमिद शेख यांची औरंगाबाद विभागीय केंद्रावर विभागीय संचालक या पदावर नियुक्ती करण्यात आली होती. सदर कार्यालयीन आदेशानुसार दिनांक 29/12/2014 रोजी डॉ. समद हमिद शेख हे औरंगाबाद विभागीय केंद्रावर विभागीय संचालक या पदावर रुजू झाले होते. दिनांक 2/11/2015 च्या पत्रान्वये एक महिन्याची आगाऊ सूचना देऊन डॉ. शेख यांनी औरंगाबाद विभागीय संचालक पदाचा राजीनामा दिला असून डॉ. शेख यांचाही राजीनामा मा. कुलगुरु यांनी स्वीकारला आहे.

डॉ. गोविंद माणिकराव कळमसे, विभागीय संचालक, नांदेड व डॉ.समद हमिद शेख, विभागीय संचालक, औरंगाबाद या दोघांचा राजीनामा मा. कुलगुरु यांनी मंजूर केला आहे. सदरीलबाब व्यवस्थापन मंडळाच्या माहितीस्तव सादर.

| | | |
|---|---|---|
| | | **व्य.मं. ठराव: डॉ. गोविंद माणिकराव कळमसे, विभागीय संचालक, नांदेड व डॉ.समद हमिद शेख, विभागीय संचालक, औरंगाबाद या दोघांचा राजीनामा मा. कुलगुरु यांनी मंजूर केला आहे. याची नोंद घेण्यात आली.** |
| | 151.5.2 | विद्यापीठातील अधिकाऱ्यांना सेवेत कायम करण्याबाबत<br>(टिपणी — (१) विद्यापीठाने सन 2013 मध्ये आरोग्य विज्ञान विद्याशाखेसाठी सहायक प्राध्यापक पदावर डॉ. अभय रघु नाथ पाटील व बांधकाम कक्षासाठी कार्यकारी अभियंता पदावर श्री. बाळू विष्णू आजगेकर यांची दोन वर्षाच्या परीविक्षा कालावधीसाठी नियुक्ती केली होती. माहे आक्टोबर 2015 मध्ये त्यांचा परीविक्षा कालावधी संपुष्टात आला आहे. (२) दि.24/7/2015 रोजीच्या खातेतंर्गत पदोन्नती समितीच्या शिफारशीनुसार व व्यवस्थापन मंडळाच्या निर्णयानुसार सहायक कुलसचिव श्री. तुळशीराम सोनवणे व श्री. मनोज घंटे या अधिकाऱ्यांचा परीविक्षा कालावधी सहा महिन्यांसाठी वाढविला होता. माहे सप्टेंबर/ ऑक्टोबर 2015 त्यांचा परीविक्षा कालावधी संपुष्टात आला आहे. उपरोक्त १ व 2 अन्वये वर्ग अ च्या शिक्षक/अधिकाऱ्यांना सेवेत कायम करण्यासाठी विद्यापीठ अध्यादेश क्र.18 (8 ऑफ 1993) मधील ३ च्या तरतुदीनुसार खातंतर्गत पदोन्नती समितीच्या दिनांक 18/11/2015 रोजी आयोजन करण्यात आले होते. (३) श्री प्रदीपकुमार पवार, सिस्टिम अँनालिस्ट यांना डिसेंबर 2015 मध्ये सेवेची बारा वर्ष पूर्ण होत असल्याने त्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यासाठी दिनांक 18/11/2015 रोजी अ गटासाठीच्या खातेतंर्गत पदोन्नती समितीचे आयोजन करण्यात आले होते. विद्यापीठ अध्यादेश क्र.18 (8 ऑफ 1993) च्या तरतूदीनुसार वर्ग अ अधिकाऱ्याने नियोक्ता अधिकारी व्यवस्थापन मंडळ असल्याने खातेतंर्गत पदोन्नती समितीचे गोपनीय अहवाल व्यवस्थापन मंडळासमोर सादर करणे आवश्यक आहे. सोबत खातेतंर्गत पदोन्नती समितीचे तीन अहवाल असलेले बंद पाकिट जोडलेले आहे. सदर बाब व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ सादर.<br>**व्य.मं.ठराव: दिनांक 18/11/2015 च्या अ गटासाठी विद्यापीठ अधिकाऱ्यांना सेवेत कायम करण्याबाबत झालेल्या बैठकीतील अहवालानुसार आरोग्य विज्ञान विद्याशाखेसाठी सहायक प्राध्यापक पदावर डॉ. अभय रघुनाथ पाटील व बांधकाम कक्षासाठी कार्यकारी अभियंता पदावर श्री. बाळू विष्णू आजगेकर व श्री. घंटे मनोज नारायण, सहायक कुलसचिव यांना सेवेत कायम करण्यात आले. व श्री. तुळशीराम सोनवणे यांचा परिविक्षा कालावधी पुढील सहा महिन्यांसाठी वाढविण्यात आला. तसेच श्री. प्रदीप पवार, सिस्टिम अँनालिस्ट यांना डिसेंबर 2015 मध्ये सेवेची 12 वर्ष पूर्ण होत असल्यामुळे त्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ देण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | 151.5.3 | निरुपयोगी / बंद वाहनांच्या विक्रीस व्यवस्थापन मंडळाची मान्यता मिळण्याची बाब विचारार्थ सादर.<br>(टिपणी — विद्यापीठातील खालील वाहने मुख्यालयात सद्या बंद स्थितीत असून ते नादुरुस्त आहेत. या वाहनाचे खरेदी वर्ष आज अखेर फिरेल्या कि.मी.चा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे दिलेला आहे. महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णयानुसार शासकीय वाहन खरेदी केल्यानंतर वापरण्याचा कालावधी १० वर्ष किंवा 2,40,000 किमी ह्यापैकी जे नंतर येईल अशी वाहने निरुपयोगी ठरवण्यात यावे असे आदेश दिलेले आहेत. आज अखेर खालील सर्व वाहनांचा 2,40,000 किमी अधिक प्रवास झालेला असून वाहन पूर्णपणे बंद अवस्थेत आहेत. या वाहनावर पुन्हा पुन्हा खर्च करणे व दुरुस्त करणे संयुक्तीक वाटत नाही. (१) MH-15 AG 8589, TATA 407, MAY 2014 , KM.4,00,000<br>(२) MH-15 AK 0139, TEMPO TRAVELLOR, AUG 2003, KM 3,50,000<br>(३) MH-15 BN 1396, INOVA, DEC 2005, KM 3,10,000<br>वरील उल्लेखलेली वाहने निर्लेखित करण्याची बाब व्यवस्थापन मंडळाच्याविचारार्थ सादर.<br>**व्य.मं.ठराव: टिपणीत उल्लेखलेली 1 ते 3 वाहने निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात आली. शासनाच्या नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात यावी.** |

सचिव<br>व्यवस्थापन मंडळ

अध्यक्ष<br>व्यवस्थापन मंडळ